
स्त्री
• लेखक •
श्रीपाद नागनाथ राऊतवाड

# स्त्री

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# स्त्री

(वैचारिक लेख)

लेखक :

श्रीपाद नागनाथ राऊतवाड

स्त्री (वैचारिक)

# श्रीपाद नागनाथ राऊतवाड

पत्ता :- मदनूर जि. कामारेड्डी (तेलंगणा राज्य)

मो. ९९७००५२८३७ / ८००७८७००२६

Mail :- Srautwad@gmail. com

Blog :- http:// shripadrautwad. blogspot. com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १५ ऑगस्ट २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे .



## ● लेखकांचा अल्प परिचय ●

नाव :- श्रीपाद नागनाथ राऊतवाड

वडील :- नागनाथ सायलू राऊतवाड

आई :- रेवती नागनाथ राऊतवाड

भाऊ :- कृष्णा नागनाथ राऊतवाड

जन्म तारीख :- 9 नव्हेंम्बर 1993

पत्ता :- मदनूर, जि. कामारेड्डी (तेलंगणा राज्य)

मो. ९९७००५२८३७ / ८००७८७००२६

Mail :- Srautwad@gmail. com

Blog :- http:// shripadrautwad. blogspot. com

पुरस्कार :- ● साहित्य सेवारत्न पुरस्कार- 2017

● राष्ट्रीय सेवारत्न पुरस्कार - 2017

लिखाण :- ●फुले, शाहू, आंबेडकर विचारधारा, ऐतिहासिक महापुरुषांच्या चरित्रावर लिखाण..

● समाजातील शेतकरी, अपंग, वृद्ध, अनाथ, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय समस्येवर प्रकाश टाकणारे लिखाण...

● समाजात चालत असलेल्या प्रासंगिक समस्यांवर व त्यांच्या परिस्थिती वर आधारित लिखाण...

● अत्ता पर्यंत 400 च्यावर वृत्तपत्रात प्रकाशित लेख...

● महाराष्ट्रा बरोबरच तेलंगणातही फुले, शाहू, आंबेडकर विचारधारेवर जवळजवळ १०० च्या वर व्याख्यानातून समाज प्रबोधनाचे कार्य..

# • प्रस्तावना •

समाजात वावरत असतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, मुख्यतः महिला वर्गांना प्रत्येक पावलांवर अन्याय अत्याचारास सामना करावा लागतोय. देशाला स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्ष लोटले तरी, महिलांना स्वातंत्र्य मिळेल का? अशी म्हणण्याची वेळ आली आहे. तीन वर्ष्याच्या चिमुकलेपासून ते सत्तर वर्ष्याच्या वृद्धेपर्यंत या अत्याचारांचे चटके सहन करावे लागत आहेत. देशात वाढणारे महिलांवरील अत्याचार, बलात्कारांचे प्रमाण पाहता स्त्रियांच्या अस्तित्वाची भीती निर्माण होत आहे. अश्या समस्येवर लिखित माझं "स्त्री" हे पाहिलं पुस्तकं आपल्या हातात देतांना मनस्वी आनंद होत आहे.

माँ. साहेब जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, या सारख्या अनेक महिलांनी आपली कर्तुत्व या जगाला दाखवून दिलेलं आहेत, ज्या व्यवस्थेत स्त्रियांना निच्छ लेखल गेलं त्याच व्यवस्थेच्या विरोधात खंबीरपणे उभारून स्त्री अस्तित्वाची ज्योत या माऊलीने पेटवली. प्रथमतः मी याच्या चरणी नतमस्तक होतो. यांच्या कर्तृत्वान इतिहासाची प्रेरणा घेऊन मी या एकविसाव्या शतकात होणाऱ्या स्त्रियांवरील अन्याय अत्याचार या समस्येवर रेखाटलेलं माझं पाहिलं ई पुस्तकाच्या माध्यमातून आपल्या पर्यंत पोहचवण्याचा हा माझा छोटासा प्रयत्न.

माझं हे पहिलंच पुस्तक असल्याने यात काही चुका किव्हा त्रुटी असल्यास ते माझ्या निदर्शनास आणून दिल्यास मी आपला ऋणी राहील. पुस्तकातील मत व विचार आवडल्यास नक्कीच प्रतिक्रिया द्या आणि इतरांना वाचण्यास शेअर करा.

**- श्रीपाद नागनाथ राऊतवाड**

★★★★★★★★★★★★★★★★

## अर्पण पत्रिका

**माझ्यात लेखन कला निर्माण करण्यासाठी**

**प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रोत्साहित करणारे**

**माझ्या आई-वडीलासह**

**सर्वांना अर्पण.......**



**( वडील - नागनाथ राऊतवाड, आई - रेणुका राऊतवाड )**

★★★★★★★★★★★★★★★★

# • अनुक्रम •


- महिलांचा प्रवास स्वातंत्र्यापासून पारतंत्र्याकडे
- हुंडा एक समाजातील ज्वलंत समस्या
- महाराष्ट्र बनलं स्त्री अत्याचारात प्रथम
- स्त्री तुला स्वातंत्र्य मिळेल का..?
- स्त्रियांनी संघटित व्हावे... !
- स्त्री अस्तित्व उभारणे काळाची गरज...
- 'कोपर्डी प्रकरण आणि प्रशासन
- स्त्री शिक्षणासाठी झगडलेल्या महापुरुषांचा विसर... !
- आश्रम शाळा बनले लैंगिक शोषणाचे अड्डे... !
- स्वतंत्र देशातील स्वतंत्र महिला वर्ग... !
- स्त्री अस्तित्वाची ज्योत - सावित्रीबाई फुले
- प्रस्थापित व्यवस्थेशी लढणारी नारी- माँ साहेब जिजाऊ
- अस्पृश्य कुटुंबातील स्त्री ( कथा).
- स्त्री भ्रूण हत्या एक शाप...
- महिलांची सुरक्षितता धोख्यात....
- स्त्रीचं अस्तित्व किती..?(कविता)

या पुस्तकातील मराठी भाषा ही तेलंगणातील मराठी भाषिकांची भाषा आहे. ती तंतोतंत पश्चिम महाराष्ट्रातील मराठी भाषेशी जुळणार नाही. परंतू ती अशुद्ध आहे असे म्हणणे चुकीचे ठरेल.

या पुस्तकातील विचारांवर जरूर चर्चा व्हावी.

या पुस्तकातील सर्व विचार हे लेखकाचे स्वतःचे विचार असून त्या सर्व विचारांशी प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.

-प्रकाशक

## महिलांचा प्रवास स्वातंत्र्यापासुन पारतंत्र्याकडे... !

महाराष्ट्र, ज्या महाराष्ट्रात राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, ताराबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर व पंडित रमाबाई यांसारख्या थोर महिलांनी प्रस्थापित व्यवस्थेत ज्या वेळी पुरुषीवृत्तीला प्रोत्साहन मिळत असताना या महिलांनी जिद्दीने पुढे येऊन समाजात महिलांच्या स्वातंत्र्य अस्तित्वासाठी लढा दिला. मात्र खंत या गोष्टीचा आहे की या स्त्री स्वातंत्र्य मिळालेल्या लोकशाही देशात मात्र स्त्रीयांवरील अन्याय अत्याचारात कुठे कमतरता भासत नाही.

नुकतेच झालेल्या मिस वर्ल्ड २०१७ मध्ये भारताची कन्या मानुषी छिल्लर हिच्या या यशाने देश गर्वाने छाती फुगवत सुटला, आणि परवाच दंगल गर्ल म्हणून प्रसिद्ध असलेली अभिनेत्री झायरा वासिम हिच्यावर विमानात विनयभंग होतो हे देशाला काळिमा फासणारी बाब नव्हे का? एकीकडे स्त्री स्वतंत्र देशात, देशाचे मान उंचावनाऱ्या स्त्रियांना अन्याय अत्याच्यारांना सामना करून देशाचं मान शर्मिनदेने झुकावे लागत आहे, ही मानवी जातिला भेडसावनारी बाब नव्हे का?, फुटपाथ वरील भीक मागून पोट भरणाऱ्या महिला पासून उच्चभ्रू, अभिनेत्री पर्यंत स्त्री जन्माला दोष देत हे समाजात चालत असलेले कृत्याला किती सहन करणार, स्त्रियांचं अस्तित्व स्वातंत्र्यातून पारतंत्र्याकडे वाटचाल करत आहे का, का.? आपणच देश्यातला स्वातंत्र्य नष्ट करून पुन्हा गुलामी लाधत आहोत, काही समजेनासे झाले..!

दिल्लीत झालेल्या निर्भया प्रकरण असो वा कोपर्डी प्रकरण या प्रकरणानंतर देश्यात एका ज्वालामुखीसारखे उद्रेकनारे मोर्चे, आंदोलनाने निघाले, अनेक महिला रस्त्यांवर उतरले, मेणबत्त्या पाजळले, मराठा क्रांती मोर्चा सारखे ऐतिहासिक मोर्चे निघाले, आत्ता वाटलं न्याय मिळेल महिला रस्त्यावर उतरले म्हणजे त्यांच्या अस्तित्वाचे, त्यांच्या स्वातंत्रेचे दिवस पाहायला मिळतील अत्ता देशातील महिलांवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना कठोर शिक्षा होईक की जेणे करून पुढची पुढी त्या विचारांचा पाईक होणार नाही, महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलेल, रात्र बे रात्र रस्त्यावरुन घरी परतणाऱ्या माझ्या आई बहिणींना अत्ता या भावाचा आसरा मिळेल, प्रत्येक स्त्री सुखरूप घरी परतेल. मात्र झालं काय हे सर्व आश्वासने उरली, बोलण्यासाठी आणि लेखांतून निदर्शनासाठी हे ओळी केवळ कागदोपत्री उरले. बाकी काय त्या महाभारतात द्रौपदी व रामायणात सीतेला अग्निपरिक्षा चुकले नाही, आणि या स्वतंत्र देशात महिलांना या समस्येला तोंड देणे चुकत नाही, देश्यात वयवर्षं तीन पासून ते सत्तर वर्षच्या वृद्ध महिला या कर्मठ विचारसरणीच्या पुरुषांच्या हातून सुटले नाहीत.

महिलांनी अनेक क्षेत्रात आपलं वर्चस्व निर्माण केले आहेत, कला, क्रीडा, शास्त्रज्ञ, अगदी राजकारणात देखील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कन्या इंदिरा गांधी यांनी १९ जानेवारी १९६६ साली भारताच्या पहिल्या स्त्री पंतप्रधान म्हणून जगासमोर आल्या, महाराष्ट्राची प्रतिभा ताई पाटील यांनी २००७ साली भारताचे पहिले महिला राष्ट्रपतीचा गौरव मिळवील्या, उत्तरप्रदेशचे पहिली महिला राज्यपाल सरोजिनी नायडू, पहिली भारतीय महिला महापौर सुलोचना मोदी, त्यानंतर तामिळनाडू, राजस्थान, पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश व

पश्चिम बंगाल या राज्यांना स्त्री मुख्यमंत्री लाभल्या. पण अद्याप महाराष्ट्राला स्त्री मुख्यमंत्री होण्याचे भाग्य अजूनही लाभलेले नाही. महाराष्ट्रात महिलांना राजकारणापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न समाजव्यवस्थेने नेहमीच केला आहे. ५० टक्के आरक्षण वाटयाला असूनही मुख्यमंत्रीपदाची धुरा सक्षम स्त्री राजकारणी सांभाळण्यासाठी अद्याप कोणतीही महिला पुढे का येऊ शकली नाही? हा प्रश्न पडला आहे. प्रस्थापित ऐकविसाव्या शतकाचा विचार केल्यास स्त्रियांना राजकारणातून क्रमप्राप्त करण्यात येत असल्याचेच चित्र निदर्शनास येत आहेत, अनेक ठिकाणी स्त्रियांना केवळ आरक्षणाच्या नावाखाली निवडणूक लढवायच आणि पूर्ण कारभार पुरुषांनी सांभाळायचं, स्त्री केवळ नामधारी सत्ताधीकारी, व्यवस्था सर्व पुरुष प्राधान्याने चाले, अश्या प्रकारे स्त्रियांना स्वतंत्रता मिळत नाही.

मागे काही दिवसांपूर्वी स्त्री हक्कांसाठी, स्त्री-पुरुष समानता या एका विशिष्ट मुद्यावरुन महाराष्ट्रातल्या काही मंदिरात स्त्रियांना प्रवेश नसल्याने त्यासाठी रस्त्यावर उतरून अनेक आक्रमक भूमिका बजावत, या लोकशाहीच्या बळावर या स्त्रियांना न्याय मिळवण्यासाठी भूमाता ब्रिग्रेड ने अनेक यशस्वी प्रयत्न केले. मात्र आजची परिस्थिती अजूनही भयावह आहे. महिला सुरक्षा कायद्यासंदर्भात, महिलांसाठी असलेल्या कायद्याच्या माहितीपासून आजही महिला अनभिज्ञ आहेत. त्यांना न्याय मिळवून देणा-या कायद्याची अंमलबजावणी योग्यरित्या होत नाही. यामुळेच प्रगत महाराष्ट्राचा महिला अत्याचारात तिसरा तर हुंडाबळीत दुसरा क्रमांक लागतो. २०१३ ते २०१४ या कालावधीत महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये ३५८ टक्क्यांची वाढ झाली आहे. या कालावधीत दर दिवशी १४ अत्याचार झाले आहेत.

दुसरीकडे हत्या व अपहरणाच्या बाबतीत उत्तर प्रदेश पहिल्या क्रमांकावर आहे. तेथे सर्वात जास्त ३०० हत्या या प्रेमप्रसांगातून घडल्या आहेत. दिल्ली चोरीच्या घटनांची "राजधानी' ठरली आहे. आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे देशात गेल्या पाच वर्षांत अपहरणाच्या अडीच लाखांपेक्षा जास्त घटना उघडकीस आल्या आहेत. पैकी ४६ टक्के अपहरण हे खंडणीसाठी नव्हे तर लग्नासाठी झालेले आहेत. ४१० मुलांचे अपहरण हे निपुत्रिक दाम्पत्याला मूल विकण्यासाठी किंवा दत्तक घेऊन देण्यासाठी झालेले आहेत. याला स्त्री - पुरुष विषमतेचे प्रमाण कारणीभूत असल्याचे सामाजिक विश्लेषकांचे मत आहे, ही वरील आकडेवारी लक्षात घेता समाजात स्त्री म्हणेज एक भोगवस्तू, तिने केवळ चूल आणि मूल यातच गुरफटून जगावं, या पलीकडे जाऊ नये, असे प्राचीन काळापासून चालत आलेली परंपरा अजूनही चालू ठेवण्याचे चित्र उदयास आले आहेत. या वर ठोस उपाय म्हणजे केवळ अत्याच्यार करणाऱ्या नराधमांना कठोर शिक्षाच नव्हे, शिक्षा तर अति कठोरतेची असलीच पाहिजे, त्याच बरोबर या समाजातील पुरुषांनी स्त्रियांवरील आदर, सन्मान देऊन रस्त्यावरील, राजकारणातील, अभिनेत्री असो वा कुठल्यही क्षेत्रात कार्यरत असलेल्या व समाजात सन्मानाने जगणाऱ्या स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बंदल्यांची सक्त गरज आहे, तरच देश स्वतंत्रतेने सुजलाम सुफलाम नटलेला दिसेल..!

## "हुंडा एक समाजातील ज्वलंत समस्या... !"

हुंडा, या दोन अक्षरी नावामुळे, समाजात दोन व्यक्तीतला फरक दर्शविते, त्या दोन व्यक्तींची किंमत ठरवते, स्त्री-पुरुष समानतेचा हा देश अत्ता सत्तरी गाठली जवळपास वृद्ध अवस्थेत हा देश जीवन जगत आहे, नवनवे संशोधन, नवनवे माहिती, जुन्या रूढी पारंपरिक गोष्टी नाकारत, डिजिटल देशात पदार्पणकरत आहोत, लोक पण डिजिटल झाले आहेत, मात्र हजारो वर्षांपासून चालू असलेली हुंडा ही समाजात बुरसटलेली प्रथा मात्र या डिजिटल इंडियात या समाजाची पाठ सोडत नाही.

समाजात बहुतांश सुशिक्षित तरुण आहेत, आणि आपल्या देश्याची वाटचाल ही महासतेच्या दिशेने चालत आहे, या वाटचालीचा बोज या नवयुवक तरुणांच्या खांद्यावरती पेललेलं आहे, याच तरुणांच्या हातावर उद्याच्या देशाच भवितव्य कोरले आहे, परंतु शोकांतिका या गोष्टीची आहे की, हा तरुण आज एका बुरसटलेल्या विचारसरणीचे पाईक होऊन समाजातल्या स्त्री घटकांना आपल्या हातानी कत्तल करण्याचं मोठा संकुचित धोरणच या देशात अमलात आणले आहेत. ते म्हणजे हुंडा प्रथा, मुलगा थोडा फार शिक्षित असला, की लग्नात मुलींच्या बापाकडून मिळणाऱ्या हुंडावर त्या कुटुंबाचा डोळा असतो, समाजात कितीही काठोरतेचा कायदा अस्तित्वात असूनही ही समाजाला लागलेल गंज मात्र काही निघत नाही.

देशात दर तासाला एक हुंडाबळी होत असल्याची धक्कादायक वात्सव एनसीआरबीने सादर केलेल्या हुंडाबळी च्या आकडेवारीतुन समोर आलं आहे. देशभरातील वेगवेगळया राज्यांमधील हुंडाबळींची संख्या २०१२ सालात ८ हजार २३३ इतकी होती. त्यावर आधारित सांख्यिकीनुसार दर तासाला एक महिला हुंडाबळी प्रकरणात मरण पावत असल्याची माहिती एनसीआरबीच्या अहवालातून समोर आली आहे. हुंडाबळी आणि तत्सम कारणांमुळे मरण पावलेल्या महिलांची संख्या २०११ साली ८ हजार ६१८ इतकी होती. २००७ साली ही आकडेवारी ८ हजार ९३ तर २००८ साली ८ हजार १७२ आणि २००९ साली हुंडाबळींची संख्या ८ हजार ३८३ इतकी होती. २०१० साली ८ हजार ३९१ महिला हुंडाबळी ठरल्या वरील आकडेवारी लक्षात घेता, समाज एकाप्रकारचे हुंडा प्रथेतला आतंकवाद निर्माण होतं चालेले आहेत, मात्र हा आतंकवादी समाजात वर मान करून मानप्रतिष्टेने वावरत आहेत.

नियमित वृत्तपत्रातून वाचनात येतो, गॅसच्या स्फोटाने नववधुंचा जाळून मृत्यू, विहिरीत पडून मृत्यू, पंख्याला लटकवून संपवली जीवनयात्रा, ही सर्व बाबी केवळ आपल्याला एका नववधुंच्याच वाटेला आलेले दिसते, या वर गांभीर्याने विचार केल्यास, ही सर्व बाबी सासरवासींकडून हुंड्या मूळे झालेल्या घटना आहेत हे लक्ष्यात येते, मी अनेक ठिकाणी समाजात अनुभवत आहे, हुंडा प्रतिबंध कायदा असतानाही तुम्ही हुंडा का देता?, असा जर प्रश्न या समाजाला विचारला तर उत्तर असेल मुलीच्या सुखी जीवनासाठी, जर मुलाच्या पार्टीला विचारल तर उत्तर येईल माझ्या मुलीला हुंडा दिला, म्हणून मी मुलाला घेत आहे, आणि तस मी जागा वेगळं काही करत नाही, जे सर्व घेतात तेच मी करतोय... ! अश्या प्रकारच्या प्रतिक्रिया

आपल्याला समाजात ऐकायला मिळतात. मात्र एक विचार करण्या सारखी बाबा आहे, या देशात या हुंडापाई अनेक संसार उधवस्थ झाले आहेत, या देशात मुलींच्या हुंड्यासाठी पैसे नाहीत म्हणून अनेक शेतकरी बापानी आत्महत्या केलेले उधारहरण आहेत, सगळयात महत्वाची बाब म्हणजे हुंड्यामुळे समाजात स्त्री जन्म पाप समजल्या जातोय, स्त्रीच्या जन्माचे दारे बंद केल्या जातोय, स्त्रीभ्रूण हत्या सारखे अनेक प्रकरणे आपल्या देशात घडत आहेत.

ताज उदाहरण लातूर जिल्ह्यातील एका शेतकऱ्याची शितल नामक मुलगी आपल्या वडिलांच्या डोहावरील कर्जाच बोज पाहुन स्वत:च्या लग्नासाठी वडिलांकडे पैसा नाही म्हणून, वडिलांची दशा पहावयास वाटले नसल्याने स्वतः आत्महत्या करून जीवन यात्रा संपवून घेतली, असे भयंकर निर्णयांना या समाजातल्या तरुणी केवळ हुंड्यामुळे घेत आहेत, अत्ता मला प्रश्न पडतोय की, हा प्रशासन व हा समाज किती शितल संपवतील..?का होत नाही कायद्याची कठेकोरपणे अमलबजावणी?, यास जबाबदार कोण?समाज का प्रशासन.?, हा प्रश्न मात्र नेहमीच पडतो.

शासकिय कायद्यांची भिती तर या समाजाला अजिबात नाही, हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ च्या कायदा ३ अनव्हे, हुंडा घेण्याबद्दल व देण्याबद्दल कमीत कमी ३ वर्ष मुदतीची कारावास शिक्षा आणि कमीत कमी रुपये १५, ००० व या पेक्षा हुंड्याच्या मुदाता इतकी रकमेच्या दंडाची शिक्षा करण्याची तरतूद आहे. हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ च्या कायदा ४ अनव्हे, कोणत्याही व्यक्तीने हुंडा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मागितल्यास त्यास कमीत कमी ६ महिन्या पासून ते २ वर्षांपर्यंत कारावास असू शकते आणि १०, ००० रुपये दंडाची शिक्षा करण्याची तरतूद आहे,

तरी आपला समाज या कायद्याच्या चौकटीत टिकत नाही, मग कधी कधी असा प्रश्न पाडतो, हा कायदाच कश्याला काढला असेल, या कायद्याची कुठल्याच परीने अमलबजावणी होत नाही, आणि झाली तर ते हजारातून एक. मग एवढी मोठी प्रशासकीय यंत्रने असून देखील प्रशासन कायद्यांची योग्य अमलबजावणी करत नाही, पोलीस खातेही तितकेच या प्रतेस जबाबदार ठरतील, आणि हा समाज मात्र हा बुरसटलेल्या विचारसारणीतून कधी मुक्त होतं नाही... !मग अशाने स्त्रीयांच अस्तित्व टिकेल का.? असा प्रश्न उपस्थित होतो. लातूरच्या शितल सारखे अजून किती शितल या समाजाला बळी द्यावे लागतील? अश्या सर्व प्रश्नांनी भावरून गेलेला हा महाराष्ट्र अत्ता शांत झाला आहे, इथे विचारांची होळी पेठवावी लागते, प्रबोधनाच वृत्त हाती घ्यावे लागते, समाजात परिवर्तन घडवून आणावे लागते, ते कार्य या नवयुवक तरुणांचं आहे आज मी शपथ घेतो तसेच या तरुणांनी जर आज शपथ घेतली पाहिजे की माझ्या लग्नात मी हुंडा घेणार नाही, तर समाज सुधारण्यास सुरवात नक्की होईल... आणि हीच शपथ त्या शितलच्या आत्म्यास शांती देईल.

# "महाराष्ट्र बनलंं स्त्री अत्याचारात प्रथम"

देशभरात चललेल्या स्त्रियांवरील अन्याय अत्याचार, बलात्काराचे प्रमाण वरचे वर वाढतंच चालले आहेत, देशात स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम स्थानाने समानता, स्वतंत्रता कधीच लूप्त झाली हे समजणे कठीण आहे, गुलामगिरीच्या जाळयातून मुक्त होऊन १५० वर्ष लोटून गेले, देश्याला स्वतंत्र मिळून ७० वर्ष लोटले, मात्र स्त्री स्वतंत्रता अजूनही मिळालेलं नाही, "चूल आणि मूल", या पलीकडील जग दर्शन मिळण्याचं हक्क प्रस्थापित करून स्त्री शक्तीच दर्शन उभ्या जगाला घडवून दिल, "राजमाता माँ साहेब जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्री, अहिल्याबाई होळकर, कवियोत्री बहिणाबाई चौधरी ", या सारख्या महापुरुष्यांच्या विचारांचं जागर आज आपल्याला पाहायला मिळत आहे, यांनी स्त्री शक्तीचा कळस एवरेशष्टच्या टोकापर्यंत पोहचवल, परंतु त्यांच्या वरिल अन्यायाचा वाचा फोडण्यासाठी कुठे तरी आज स्त्री वर्ग गुलामीच्या, अंधश्रद्धेच्या, बुवा बापूंच्या अमिश्याला बाळी पडत चाललेला स्त्री समाज कुठे तरी आपल्या इतिहासाला विसरत चाललेत असे म्हणायला काही हरकत नाही, आज आपल्या देशात विधेची देवता म्हणून सरस्वतीची पूजा करतो, आजची महिला आपल्या पतीच्या सातजन्माची गाठ असावी यासाठी वटसावित्रीची पूजा करते, संतान प्राप्तीसाठी बुवा बापूंकडे दर्शन घेते, देवळांत नवस करते, यासर्वांचा विचार केला तर असं वाटते की आजच्या स्त्रियांकडे आत्मविश्वास कमी पडतोय, स्वतः पेक्षा दगडावर विश्वास ठेवून आपल्या अज्ञानाची जाणीव करून देत आहेत, या वर राष्ट्र संत तुकाराम महाराजांनी एक छानस अभंगाची रचना केली, त्यातलं हि ओळ अंधश्रद्धेला जुलमी ठेरावते.

"नवसे कन्या पुत्र होती, तर का करावे लागी पती".

एकीकडे महिलांचे मनोध्यर्य बळकट नाही तर दुसरीकडे वाढते स्त्री अत्याचारांचे संख्येत महाराष्ट्र हादरून गेला, सण २०१६ च्या स्त्रियांवरील गुंन्यांची संख्या ३१ हजार १२६ वर पोहचली, २०१४-१५चाही रेकॉर्ड ब्रेक केलं, मागील बलात्कार व महिलावरील अत्याचारांची २०१३ ची अकडेवारी १७ हजार ३५ घटनांपैकी सर्वाधिक १३ हजार ८२७ तक्रांरींची नोंद महाराष्ट्रात झाली. मद्यप्रदेश मध्ये १३ हजार ३२३ तक्रारीची नोंद आहे तर आंध्रप्रदेश मधील १३ हजार २६७ महिलांवरील अत्याचारांची नोंद झालेली आहे, तीन वर्षा आधी झालेल्या आकडेवारीत स्त्री अत्याचारांच्या सर्वाधिक घटना, उत्तर प्रदेश व बिहार राज्यात असल्याचे सांगण्यात आले, मात्र २०१३-१४ मधील स्त्री अत्याचारांची प्रशासकीय आकडेवारी लक्ष्यात घेता महाराष्ट्र हा दुसऱ्या क्रमांकावर आलं. महाराष्ट्रात बलात्कार, अपहरण, पळून नेणे, हुंडाबळी पती व त्याच्या नातेवाईकांकडून झालेले अत्याचार, विनयभंग, लैंगिक अत्याचार, अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा व इतर असे गुन्हे २०१४ मध्ये २६ हजार ६९३ घडले, २०१५ मध्ये गुन्ह्यांची अकडकेवारी ३१ हजार १२६ म्हणजेच पाच हजारांनी वाढली, २०१६ मध्ये या गुन्ह्यात एक हजारांनी वाढ होऊन हि आकडेवारी तब्बल ३२ हजार ५४८ वर जाऊन पोहचली आहे. २०१४ मध्ये बलात्काराच्या ३ हजार ४३८ घटना घडल्या होत्या. २०१५ मध्ये हा आकडा ४ हजार १४४ वर जाऊन पोहचली, २०१६ मधील घडलेल्या बलात्कार प्रकरणांची संख्या ४ हजार २०९ आहे, विनयभंगाच्या दहा हजारावरून ११ हजार ३८८ वर पोहचल्या आहे. देशात

गुन्हेगारीत नेहमीच उत्तर प्रदेश बिहारला हिनवले जाते, मात्र महाराष्ट्र राज्यातील महालीवरील गट तीन वर्ष्यातील अत्याचार्यांच्या गुन्ह्यांची संख्या पाहता, हेच का पुरोगामी व सुसंस्कृत महाराष्ट्र असा सवाल मात्र नेहमीचं पडतोय.

आपला भारत देश हा पुरुष प्रधान देश आहे, इथे फक्त पुरुषांचीच मान उंचावर टांगलेली असते, जरी कायदा स्त्री पुरुष समानतेचा हक्क दिला तरी स्त्रियांना दुय्यम स्थान मिळतो, आपल्या भारत देश्यात दर वीस मिनिटांत एक बलात्कार घडतो, हा संशोधनाचा भाग आहे, स्त्री सुरक्षिततेचा कायदा जरी असला तरी ते अमलात का येत नसेल हा हि विचार करण्या जनक बाब आहे, नेमकं काय घडतेय, स्त्री आपल्या वरील अन्यायाचा जाब विचारण्या साठी रस्त्यांवर उतरू शकत नाही, कोर्टाच्या पायऱ्या चढु शकत नाही, पोलीस स्टेशन गाठवू शकत नाही, असे का होते?, कारण स्त्रियांना कुठे तरी दाबलं जात, धमकावल्या जात, कितीही प्रशासकीय यंत्रने कठोर असले तरी, इज्जतीशी तडजोड करीत आपल्यावरील झालेल्या अन्यायाची जाब विचारने हा समस्थ स्त्री वर्गाचं एक प्रश्न चिन्ह आहे.

मागे काही दिवसांपूर्वी कोपर्डी प्रकरण घडलं, फक्त १६ वर्षयाच्या निरापधार मुलींवर वासनेच्या भुकेने व्याकुळ असलेले काही नराधमांनी तिच्यावर बलात्कार करून तिच्या शरीराचे लचके तोडले, तिची हत्या केली, किती सहन करायच त्या चिमुकलीने, ह्या प्रकरनारवरून महाराष्ट्रात राजकारण पेठून उठलं, त्यातच जाती-जातीत मतातंर झाले, मराठा क्रांती मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा, एकमेकांत वरचढ झाली, अनेक मोर्चे निघाले, लाखोंच्या संख्येने एकत्रित येणाऱ्या समाज बांधवांना पाहून असं वाटलं अत्ता नक्कीच स्त्रियांवरील होणाऱ्या अन्यायावर प्रशासनाची काहीतरी काठोर निर्णय असणार परंतु तस काही झालं नाही, जैसे थे

स्थिती कायम आहे, या आगोदर दिल्लीतील निर्भया प्रकरणाने अख्क देश हादरून सोडलं होत, तेव्हा पण अनेक महिला रस्त्यांवर उतरले, मेणबत्या पाजळल्या परंतु या सर्वातून शेवटी मात्र काही साध्य झाले नाही, शेवटी स्त्री हि एक भोग वस्तू ठरली आहे, प्रत्येक स्थरावर स्त्री पोहचली, पुरुषयांच्या खांद्याला खांदा लावून आज स्त्री चूल आणि मूल या पलीकडे व्यवहारिक जीवनात प्रवेश केली, परंतु तिथे पण तिच्या सुरक्षतेचा मुद्दा चावंट्यावर येतोय, स्त्री सुरक्षते बाबतीत अवघीच बोबबोंब दिसतोय.

भारत देशात स्त्री अत्याचार हि एक भयानक विकृती आहे, सिनेमातील नटीचे बिभत्स प्रदर्शन, मालिकेत दाखवल्या जाणाऱ्या माहिलेवरील अत्याचार या सर्व प्रदर्शनाचा परिणाम समाज जिवणावर होत आहेत, वाईट नजरेच्या प्रदर्शनाने महिलांकडे पुरुषांची बागण्याचं दृष्टीकोण बदलत चालली आहे, आणि बलात्कार, स्त्री अत्याचार, लैगिक शोषण या सारखे समाजाला काळिमा फासणारे कृत आज समाजात घडत आहेत, या साठी स्त्री संघटित होऊन स्वतः वरील जाब संघटित पणे लढा उभारून विचारण्याची वेळ आली आहे, स्त्रियांवरील अश्याप्रकारे होणाऱ्या अत्याचारावर, आपल्या हक्काची जाणिव ठेऊन प्रत्येक स्त्री आज संघटित पणे लढा उभारण्याची गरज आहे, आपल्या लेखणीच्या जोरावर किव्हा वक्तव्यच्या बळावर या विश्वाच्या प्रत्येक क्षेत्रात समानतेचा अजेंडा असणे काळाची गरज आहे, तरच महिलांवरील होणाऱ्या अन्यायावर ठोस पाउल उचलल्या जातील.

## "स्त्री तुला स्वतंत्र मिळेल का..?"

काही महिण्याखाली दहावी आणी बारावीचा निकाल आपण बघितलात, यावरून स्पष्ट दिसतेय की गेल्या चार वर्षापासून निकालावरील बाजी हि मुलींनीच मारलेल दिसतोय, शैक्षणिक क्षेत्रात स्त्रीयांची वाढती प्रगती पाहता सर्वांनाच अपुलकेची जाणीव होत आहे, स्त्रीयांच्या वाढत्या उच्चांकाच स्वागत प्रत्येक क्षेत्रातून होतांना दिसतोय, परंतू स्त्रीयांची गरूढ झेप ही काही मोजक्याच स्थरांपर्यंत पोहचत आसल्याची जाणिव होत आहे, अनेक शासकीय निशासकीय कार्यालयात उच्च स्थरावर महिला कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत, परंतू वेळोवेळी मात्र यांच्या सुरक्षेचा मुद्दा चाव्हट्यावर येतो, अनेक कार्यालयात महिला वर्ग अत्याचारांशी सामना करतानांचे चित्र दिसत आहे, प्रशासनाने अनेक कठोर कायदे उपकृम राबवलेत पण अमलबाजावणी मात्र होतांना दिसत नाही.

आपल्या देशाला स्वातंत्र मिळाले, देशात लोकशाही आली. सर्वांना समान हक्क आला. अनेक महिला आपल्या हक्काची जाणीव करून घेत खुप उंचावर पोहचल्या ; पण त्यांच्या सुरक्षेच्या बाबतीत मात्र अवघीच बोबांबोंब दिसते. काही दिवसापुर्वी दिल्लीत झालेल्या एका आल्पवयीन मुलीवर सामुहिक बलात्काराची घटना आठवता अंगावर काटा उभा राहतो. इतकी गंभीर घटना होती. त्या घटनेनंतर देशातील महिला रस्त्यावर उतरल्या, तेव्हा वाटले, आता देशात महिलांना सुरक्षा मिळेल. कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होइल; पण त्याबाबत घोर निराशा झाली आहे. महिलांवरील आत्याचाराची मालिका काही थांबत नाही. लैंगिक आत्याचाराबरोबर

मारझोड, घटस्फ़ोट, सासरच्या माणसांकडून होणारा शारिरीक आणी मानसिक त्रास, लग्नासाठी धमकी देणे, पळवून नेणे अशा अनेक कारणांनी महिलांवर आत्याचार होतो. आत्याचार वाढण्यास प्रशासन, पोलिस खाते जबाबदार आहे. प्रशासनाने केलेल्या स्त्री संरक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. आत्याचार झालेल्या पीडीत व्यक्ती पोलीसांकडे जाऊन आपल्यावर आत्याचार झाल्याची नोंद करत नाही. कारण नोंद केली तरी पोलीसांकडुन तपास योग्य रीतीने होइल याची खात्री नाही, न्याय मिळवण्याची प्रक्रिया फार विलंबाची व किचकट आसल्याने सहासा कोणी या वाटेलाच कोणी जात नाही.

एक तेलुगू मधला कांमगार आहे यांने एक कविता केली, त्यात तो म्हणतो, ऐक तरून नुकतेच पदविका घेवून वकिलकी प्राप्त झाली होती, त्याला अजून कुठलेच वाईट व्यसन लागलेल नव्हत, माणूसकी साबूत होती, आणी त्याला कोर्टाच्या पायऱ्या चडतांना दिसल, तिथे एक म्हातारी उटत बसत पायऱ्या उतरत होती, त्या म्हातारी ला हा वकिल प्रश्न विचारला कि, "आजी तु ऐवढ्या म्हाताऱ्या वयात कोर्टात कसे का?", तेव्हा म्हातारी सांगते, "बेटा माझ्या वर वयाच्या 16 व्या वर्षी बलात्कार झाला होता, त्याच निकाल आज 80 व्या वर्षी लागल आहे, आणि बलात्कारा पेक्षा मला आज वेदना जास्त झाल्या, कारण न्यायाधीश निकाल देतांना म्हणाला, 'सबळ पुरावे अभावी निर्दोष मुक्तता', न्याय तरी मिळाला का वयाच्या 80 व्यावर्षी. " आज कोर्टाचे आपलेच न्यायाधीश सांगतात अजूनही 3. 5 कोटी खटले प्रलंबित आहेत.

नियमीत वृतपत्रात निधान एक तरी बातमी आपणांस आढळून येते महिलांवरील आत्याचार झाल्याची, असे काही बातम्या वाचण्यात येत आहेत की वाचल्याबरोबर मण सुन्न पडावा, इतके भयंकर दृष्य, चार वर्षाच्या चिमूकलीवर

झालेला बलात्कार, खरेच या देशाला स्वंतत्र मिळून 69 वर्ष झाले तरी महिलांना मात्र अजूनही स्वतंत्र नाही, महिलावर्ग आजूनही गुलामीत जगत आहेत, यांना कितीही आरक्षणाने शासनांचे कागदे भरवले तरी, कृतीशील अमलबाजावणी शिवाय महिला स्वतंत्र पणे समाजात वावरू शकत नाही.

वास्तविक पाहता स्त्रियांच्या प्रश्नांना अनेक पदर आहेत. खरे तर परंपरा आणि वर्तमान यांच्या अंतर्वविरोधामध्ये स्त्री-प्रश्नाचा धागा अडकलेला दिसून येतो. त्यातून वर्तमानामध्ये स्त्रियांच्या शोषणाचे विभिन्न स्वरूप पाहायला मिळतात. या घटकांतर्गत मध्यमवर्गीय महिलांवर नोकरीच्या जागी पुरुषसत्तेकडून होणारा त्रास, भारतातील समृद्ध प्रदेशात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे कमी होत जाणारे प्रमाणाचे वाढते चित्र उद्भवतोय.

अर्धं जग बायकांचं असलं तरी तिची त्या जगातली जागा गौण असावी हे काही पुरुषांच्या डोक्यात इतकं ठाम बसलंय, की त्यांना कुठल्याही बाबतीत पुढाकार घेणारी स्त्री सहन होत नाही. स्त्री हे पुरूषांच्या दृष्टीत भोग वस्तू ठरली आहे, महिलांने पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणे समाज अंगीकार करत नाही, एखादी मुलगी का ॅलेजला गेली तर रस्त्यावरील युवकांचे विभत्स नजरा त्या मुलींवर असतात तर काही ठिकाणी छेडछाड पण केली जाते, परंतु आजूबाजूचा समाज मात्र बघण्याच्या भुमीकेत दिसतात, यावरून पुरूष प्रधान देशात महिलांवरील पुरूषांची मानसीकता किती संकोचित विचारधारेची आहे याचा आंदाज निघतो, महिलांवरील अत्याचारांना आळा घालण्यासाठी, राज्यातल्या महिलांनी पुढाकार घेणे गरजेच आहे. भुमाता ब्रिगेड ची रणरागीणी तृप्ती देसाई यांनी महिलांच्या मंदिर प्रवेशसाठी केलेला संघर्ष, यातून मिळालेला स्त्री-पुरूष समानता या सर्व बाबींना एकतर्फी लढा उभारल्यावर होणारा विरोध पहाता, पुन्हा स्त्री जातीतला निघणारा भेद लक्षात घेता समाजातील पुरूष वर्ग किती संकुचित विचारधारेची असतील याचा अंदाज काढता येतो.

महिलांवरील होणारे अत्याचार रोखण्यासाठी समाजाच्या मानसिकतेत बदल होण्याची गरज आहे. अत्याचारास आळा घालण्यासाठी समाजाने पुढे येण्याची गरज आहे. सर्व समाजातील लोकांनी आपली मुलगी व मुलगा यांच्यावर योग्य संस्कार करणे आवश्यक आहे.  एक मुलगी शिकणे म्हणजे कुटुंब शिकण्यासारखे आहे, म्हणून मुलींना शिक्षण घेण्यास प्रवृत करावे, स्त्रीवर होणाऱ्या अत्याचार थांबवणासाठी पुरूष सक्षम होणे काळाची गरज आहे, प्रशासन व्यवस्था, व भ्रष्ट अधिकारी यांनी कायद्याला विभत्स प्रकारे वापरात आनले, त्यांची काटेकोरपणे योग्य अमलबाजावणी होणे गरजेच आहे.

## "स्त्रियांनी संघटित व्हावे... !"

देशभरात चललेल्या स्त्रियांवरील अन्याय अत्याचार, बलात्काराचे प्रमाण वरचे वर वाढतंच चालले आहेत, देशात स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम स्थानाने समानता, स्वतंत्रता कधीच लूप्त झाली हे समजणे कठीण आहे, गुलामगिरीच्या जाळयातून मुक्त होऊन १५० वर्ष लोटून गेले, देश्याला स्वतंत्र मिळून ७० वर्ष लोटले, मात्र स्त्री स्वतंत्रता अजूनही मिळालेलं नाही, "चूल आणि मूल", या पलीकडील जग दर्शन मिळण्याचं हक्क प्रस्थापित करून स्त्री शक्तीच दर्शन उभ्या जगाला घडवून दिल, "राजमाता माँ साहेब जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्री, अहिल्याबाई होळकर, कवियोत्री बहिणाबाई चौधरी ", या सारख्या महापुरुष्यांच्या विचारांचं जागर आज आपल्याला पाहायला मिळत आहे, यांनी स्त्री शक्तीचा कळस एवरेशष्टच्या टोकापर्यंत पोहचवल, परंतु त्यांच्या वरिल अन्यायाचा वाचा फोडण्यासाठी कुठे तरी आज स्त्री वर्ग गुलामीच्या, अंधश्रद्धेच्या, बुवा बापूंच्या अमिश्याला बाळी पडत चाललेला स्त्री समाज कुठे तरी आपल्या इतिहासाला विसरत चाललेत असे म्हणायला काही हरकत नाही, आज आपल्या देशात विधेची देवता म्हणून सरस्वतीची पूजा करतो, आजची महिला आपल्या पतीच्या सातजन्माची गाठ असावी यासाठी वटसावित्रीची पूजा करते, संतान प्राप्तीसाठी बुवा बापूंकडे दर्शन घेते, देवळांत नवस करते, यासर्वांचा विचार केला तर असं वाटते की आजच्या स्त्रियांकडे आत्मविश्वास कमी पडतोय, स्वतः पेक्षा दगडावर विश्वास ठेवून आपल्या अज्ञानाची जाणीव करून देत आहेत, या वर

राष्ट्र संत तुकाराम महाराजांनी एक छानस अभंगाची रचना केली, त्यातलं हि ओळ अंधश्रद्धेला जुलमी ठेरावते.

**"नवसे कन्या पुत्र होती, तर का करावे लागी पती".**

आपला भारत देश हा पुरुष प्रधान देश आहे, इथे फक्त पुरुषांचीच मान उंचावर टांगलेली असते, जरी कायदा स्त्री पुरुष समानतेचा हक्क दिला तरी स्त्रियांना दुय्यम स्थान मिळतो, आपल्या भारत देश्यात दर वीस मिनिटांत एक बलात्कार घडतो, हा संशोधनाचा भाग आहे, स्त्री सुरक्षिततेचा कायदा जरी असला तरी ते अमलात का येत नसेल हा हि विचार करण्या जनक बाब आहे, नेमकं काय घडतेय, स्त्री आपल्या वरील अन्यायाचा जाब विचारण्या साठी रस्त्यांवर उतरू शकत नाही, कोर्टाच्या पायऱ्या चढु शकत नाही, पोलीस स्टेशन गाठवू शकत नाही, असे का होते?, कारण स्त्रियांना कुठे तरी दाबलं जात, धमकावल्या जात, कितीही प्रशासकीय यंत्रने कठोर असले तरी, इज्जतीशी तडजोड करीत आपल्यावरील झालेल्या अन्यायाची जाब विचारने हा समस्थ स्त्री वर्गाचं एक प्रश्न चिन्ह आहे.

मागे काही दिवसांपूर्वी कोपर्डी प्रकरण घडलं, फक्त १६ वर्षयाच्या निरापधार मुलींवर वासनेच्या भुकेने व्याकुळ असलेले काही नराधमांनी तिच्यावर बलात्कार करून तिच्या शरीराचे लचके तोडले, तिची हत्या केली, किती सहन करायच त्या चिमुकलीने, ह्या प्रकरनारवरून महाराष्ट्रात राजकारण पेठून उठलं, त्यातच जाती-जातीत मतातंर झाले, मराठा क्रांती मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा, एकमेकांत वरचढ झाली, अनेक मोर्चे निघाले, लाखोंच्या संख्येने एकत्रित येणाऱ्या समाज बांधवांना पाहून असं वाटलं अत्ता नक्कीच स्त्रियांवरील होणाऱ्या अन्यायावर

प्रशासनाची काहीतरी काठोर निर्णय असणार परंतु तस काही झालं नाही, जैसे थे स्थिती कायम आहे, या आगोदर दिल्लीतील निर्भया प्रकरणाने अख्क देश हादरून सोडलं होत, तेव्हा पण अनेक महिला रस्त्यांवर उतरले, मेणबत्या पाजळल्या परंतु या सर्वातून शेवटी मात्र काही साध्य झाले नाही, शेवटी स्त्री हि एक भोग वस्तू ठरली आहे, प्रत्येक स्थरावर स्त्री पोहचली, पुरुषयांच्या खांद्याला खांदा लावून आज स्त्री चूल आणि मूल या पलीकडे व्यवहारिक जीवनात प्रवेश केली, परंतु तिथे पण तिच्या सुरक्षतेचा मुद्दा चावंट्यावर येतोय, स्त्री सुरक्षते बाबतीत अवघीच बोबबोंब दिसतोय.

भारत देशात स्त्री अत्याचार हि एक भयानक विकृती आहे, सिनेमातील नटीचे बिभत्स प्रदर्शन, मालिकेत दाखवल्या जाणाऱ्या माहिलेवरील अत्याचार या सर्व प्रदर्शनाचा परिणाम समाज जिवणावर होत आहेत, वाईट नजरेच्या प्रदर्शनाने महिलांकडे पुरुषांची बागण्याचं दृष्टीकोण बदलत चालली आहे, आणि बलात्कार, स्त्री अत्याचार, लैगिक शोषण या सारखे समाजाला काळिमा फासणारे कृत आज समजत घडत आहेत, या साठी स्त्री संघटित होऊन स्वतः वरील जाब संघटित पणे लढा उभारून विचारण्याची वेळ आली आहे, स्त्रियांवरील अश्याप्रकारे होणाऱ्या अत्याचारावर, आपल्या हक्काची जाणिव ठेऊन प्रत्येक स्त्री आज संघटित पणे लढा उभारण्याची गरज आहे, आपल्या लेखणीच्या जोरावर किव्हा वक्तव्यच्या बळावर या विश्वाच्या प्रत्येक क्षेत्रात समानतेचा अजेंडा असणे काळाची गरज आहे, तरच महिलांवरील होणाऱ्या अन्यायावर ठोस पाउल उचलल्या जातील.

# स्त्री अस्तित्व उभारणे काळाची गरज...

आसिफा, आठ वर्षाची चिमुकली तिला तिचा धर्मही माहीत नसेल, तिला भेदभाव ही कळत नसेल, निरागस आणि निरपराध चिमुकली. तिच्यावर झालेल्या अत्याचाराने, या प्रकरणाला आज देश भरात एक धार्मिक वळण घेतले आहे, हिंदू-मुस्लिम असा काही गट तटाचे राजकारण पुन्हा पून्हा आमच्या तरुणांच्या डोळ्यासमोर ठेवण्याचा कटकारस्थानच म्हणावे.

**इथे माणुसकीचा घात होतोय,**

**इथे धर्म नव्हे ना कुठला जात येतोय,**

**इथे देश नव्हे ना कुठला प्रांत येतोय,**

**इथे निष्पाप स्त्री जातीला मारलं जातोय,**

**इथे केवळ माणुसकीचा घात होतोय....**

एका निष्पाप, कवल्या कळीचे देठ कुणी कर्मठ वृत्तीने तोडतो, या करमठांना ना जात असतो ना धर्म, आरोपी हे शेवटी आरोपी असतो, ते कोणत्याही धर्माचा असो वा जातीचा, ज्या वेळी तो असे कृत्य करतो तेव्हाच त्याने स्वतःच धर्म, जात सगळं काही सोडलेलं असते, माणूस म्हणून नव्हे तर जनावर म्हणून सुद्धा हा समाज अश्यांना अंगीकार करत नाही, मात्र या मध्ये एक वर्ग निर्माण होतो तो म्हणजे

आरोपींना पाटी घालणारा, हा वर्ग प्रशासकीय असो वा इतर. हा वर्ग म्हणजे लोकशाहीच्या विरोधात जाऊन, अन्यायग्रस्त कुटुंबाला वेळोवेळी धमकीवण्याचा प्रयत्न करतो, प्रकरण दाबण्याचा पुरेपूर प्रयत्न करतो, असे अनेक ठिकाणी आपण पहिलेच असणार आज पर्यंत कित्येक महिलांवर अश्या प्रकारे अत्याचार झाले, बलात्कारासारख्या भयानक कृत्य या स्त्रीवर्गावर नित्यनेमाने चालत आलेत, आणि कित्येक प्रकरणे स्थानिक प्रशासकीय व्यवस्था व आर्थिकतेच्या जोरावर अनेक प्रकरणे यशस्वीपणे दाबण्यात ही कर्मठ वृत्तीचे नराधम, व न्याय व्यवस्था प्रयत्नशील झाले असल्याचे आपल्या आजूबाजूच्या परिसरात दिसून येते.

आसिफा सारख्या एका आठ वर्ष्याच्या चिमुकलीवर देखील अशीच परिस्थिती निर्माण झाली, तिच्या शारीरिक उन्नती होण्या अगोदर तिच्या शरीराचे लक्तरे बाजारात मांडणारे दुसरे कोण.?"सदरक्षणाय खलनिग्रहणाय", म्हणत जनसामान्यांची मदत करणारे, हीच जे आपल्यावर झालेल्या अन्यायावर न्यासाठी ज्या पोलीस स्टेशनचे पायरी चढतो, ते पोलीस अधिकारी स्वतःच्या वासनेच्या भुकेसाठी चिमुकल्या बाळाला मारले, या निष्पाप जीवाने काय केल, तिला कधी स्वतःच धर्म नसेल माहीत, तिला कधी स्वतःच अस्तित्व नसेल माहीत, खेळणींच्या वयात तिच्या शरीरासोबत खेळणारे, तिच्या जीवाशी खेळणारे यांना मानव म्हणावं का.? यांना नाही का दिसली त्या आसिफामध्ये स्वतःची मुलगी.? सदरक्षणाय खलनिग्रहणाय म्हणत अन्यायावर प्रहार चालवणारे जनसामान्यांना न्याय देणार व्यासपीठ म्हणून पोलीस खात्याकडे पाहिले जाते, अश्या कर्तव्यदक्ष पोलीस खातेला या करमठांनी कलंक लावला....

कटूआ च्या आसिफा प्रकरणा नंतर गुजरातमधील सुरत मध्ये १० वर्षच्या तर मराठवाड्यातील परभणी मध्ये १० ते ११ वर्ष्याच्या चिमुकलीवर बलात्कार सारखे भयानक कृत्य घडल्याचे धक्कादायक घटना समोर आले, देश कोणत्या वळणावर प्रवास करत आहे, हे समजणे कठीण झाले आहे, अश्या कर्मठ आरोपींना प्रशासनाने काढलेल्या नवीन कायद्या नुसार फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, अन्यथा देश्यात स्त्री जन्म पुन्हा पाप समजण्याची वेळ येत आहे...

मागे झालेल्या दिल्लीतील निर्भया प्रकरण असो, वा कोपर्डी सारखे प्रकरण आणि अत्ता कटूआच्या आसिफा प्रकरण या प्रकरणानंतर देश्यात एक स्त्री स्वातंत्र्य, स्त्री अस्तित्वासाठी ज्वालामुखी सारखे उद्रेक पावणारे निषेधमोर्चे आम्हाला पाहायला मिळाले, त्यात आम्हीपण सहभागी झालोत. स्त्रियांवर होणारे बलात्कार, अत्याचार हा प्रकार नवीन नाही, कित्येक वर्षापासून ही स्त्री या अत्याचारास सामना देत आहे, या व्यवस्थेशी लढत आहे, न्यायासाठी रस्त्यावर येत आहे, हातातले मेणबत्ती पाजळते आहे. देश स्वतंत्र झाला तरी स्त्रीला या अत्याचारापासून स्वतंत्र मिळाले नाही,

देश्यात वयवर्षं तीन पासून ते ८० वर्षाच्या वृद्धांपर्यंत स्त्री सुरक्षित नाही, प्रत्येक स्त्री नित्यनेमाने आपल्यावरील अन्याय अत्याचार सहन करतच आहे, किती दिवस हा अन्याय या स्त्री ने सहन करायचं, देश तर बलात्काराच्या यादीत अग्रस्थानी येऊन ठेपला, इथे प्रत्येकी २० मिनिटाला एक बलात्कार होतो, म्हणजे अजून काही वर्ष्यात मिनिटांचे आकडेवारी सेकंदात मोजण्याची वेळ येईल.

शेवटी एकच, आतंकवादी असो व बलात्कारी यांना ना जात असते ना धर्म म्हणून या देश्यात अश्या प्रकरणांना जातीय वळण देऊन, अन्यायग्रस्ताना केवळ

बॅनर पुरते मर्यादित ठेऊन राजकीय पोळी भाजणाऱ्या निर्लज्य समूहात वावरण्यापेक्षा या तरुणांनी यावर विचार करून पाऊल उचलावे ही विनंती, आसिफा सारख्या देश्यात कित्येक चिमुकळीवर अत्याच्याराच्या घटना घडत आहेत, आसिफाला न्याय मिळेल यासाठी हा जागृत समाज जागृतच राहील आणि यापुढील अत्याचारावर प्रहार चालवण्या सक्षमपणे मैदानात उभा राहील अशी अपेक्षा या तरुणांनाकडे करतो, आज आसिफा वर आलेली वेळ पुन्हा माझ्या देश्यातल्या कुठल्याच स्त्रीवर्गावर येणार नाही यासाठी स्त्रीयांनी पुन्हा एकदा आपली पदर कमरेला खऊन न्यायासाठी खंबीरपणे उभा राहणे काळाची गरज...

## "कोपर्डी प्रकरण आणि प्रशासन"

अख्या महाराष्ट्रासह देशाला हदरा बसणार प्रकरण म्हणजे अहमदनगर जिल्हातील कर्जत तालूक्यातील कोपर्डी या गावातील एका नववी वर्गात शिक्षण घेणाऱ्या 14 वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून निघृनपणे हत्या केलेली घटना, मानूसकीला काळीमा फासनारी घटना गेल्या 13 जूलै ला घडली. या घटनेचा महाराष्ट्र भरात विविध क्षेत्रातून निषेध होत आहे.

महाराष्ट्रसह देशाला सुन्न करून सोडणारी घटना कर्जत तालूक्यातील कोपर्डी येथील एका छोट्याश्या वस्तीत राहणारी श्रध्दा सुद्रीक या नववीत शिकणाऱ्या निरागस मुलीचा दिनांक 13 जूलै रोजी सायंकाळी सायकल वरून घरी परतत असतांना काही नराधमांनी वाटेत दबा धरून बसले, एखाद्या हरणावर झडप मारावी तशी तिच्यावर झडप मारून लैंगगीक अत्याचारा पाटोपाठ निघृनपणे हत्या केले. निरागस कोमळ कळिचा फुलांत रूपांतर होऊ नदेता झाडांच्या देठांपासून दुर करावे अशी श्रद्धाला तिच्या जिवनावरील वाट चुकवली, तिच्यावरील झालेला अत्याचार, व त्या माथेफिरुने केलेला निघृनपणे हत्या ही मानूसकी धर्माला काळीमा फासणारी घटना आहे.

हि घटना 13 जूलै रोजी घडली, परंतू याची दखल सर्वात जलद म्हणणाऱ्या कुठल्याच मिडीयाने घेतली नव्हती, तु-तू मि-मी म्हणत घटनेच्या तिसऱ्या दिवस उजडला म्हणजे 16 जूलै रोजी सर्व मिडाया मंडळींना जाग आली, जशी नुकतीच घडलेली घटना म्हणून सर्वत्र प्रदर्शनात आले, मात्र पालकमंत्री ना. राम शिंदे यांच्या समवेत असलेली अरोपींचा फोटो जेव्हा सोशीयल मिडावर वायरल झाली, तेव्हा कुठे सर्वांना जाग आल्याच दिसतोय, गेल्या चार दिवसात नगर जिल्ह्यातील

काही वृतपत्र वगळता कुठल्याच वृतपत्राने याची दखल घेतली नव्हती, सोशीयल मीडियावरून होणारा निषेध लक्षात घेवून सर्व महाराष्ट्रभरात महाशय पेटल, काही ठिकाणांवरुन जातीयता अक्रोषांच वातावरण पेटवून सोशीयल मीडीयाद्वारे कालवा कालवीस सुरवात झाली, तर काही क्षेत्रातुन मानुसकीला काळीमा फासवणारी कृत्य या दृष्टीने या घटनेकडे निदर्शले, जिल्हे, तालूके, गावे बंदीस नागरीकांनी अक्रोशाने प्रतिसाद दिले, तर काही ठिकाणी हिंसक प्रवृत्तीने निषेध झाला.

13 जूलै च्या घटनांला 16 जुलैला उजाळा मिळताच मंत्री संत्रींना कोपर्डीची वाट दावली, आपल्या चार चाकी गाडीने धुरडा उडवीत श्रद्धाच्या कुठूंबाचे सांत्वन करत का ॅलर टाइट केले, कोपार्डीची वास्तविक परिस्थिती यांना आता दिसू लागले, शालेय विद्यार्थ्यांना गावातून 5-10 किमी आंतरावर सायकवर व पायपीट करीत शाळेत जावे लागते, ना कुठली बसची सेवा, ना कुठली सुरक्षेचा अधार. कोपर्डी सारखे महाराष्ट्रात अनेक गावे आहेत, तिथे आजूनही कुठल्याच शासकीय व्यवस्था उपलब्ध नाहीत, महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा वेळोवेळी चाव्हटावर येण्याच कारण म्हणजे प्रशासन या याबाबींकडे सक्षम नाही, गेल्या काही दिवसापुर्वी कोपर्डी प्रकरणासारखेच दिल्लीत झालेल्या एका आल्पवयीन मुलीवर सामुहिक बलात्काराची घटना आठवता अंगावर काटा उभा राहतो. इतकी गंभीर घटना होती. त्या घटनेनंतर देशातील महिला रस्त्यावर उतरल्या, मेनबत्या पाजळल्या, तेव्हा वाटले, आता देशात महिलांना सुरक्षा मिळेल. कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होइल पण त्याबाबत घोर निराशा झाली आहे, प्रशासक महिलांच्या सुरक्षतेच्या कायद्यांकडे कठोरतेने शासन करत नसल्या ऐकमेव कारणांनी या देशात अश्या समस्यांना तोड देत चललो आहोत.

आतंकवादींना व बलात्कार्यांना कुठलाच जात धर्म नसतो, तो गुन्हा त्यांच्या मनोवृतीचा आसतो, त्यांच्या निच्छ विचारधारेचा आसतो, अश्या अरोपींना फाशीची शिक्षा झालीच पाहीजे, कारण भारत हा जगात बलात्काराबाबतीत सातव्या क्रमांकाचा देश आहे, दर 22 मिनीटात एक बलात्कार आपल्या देशात घडत असतो, यावरून देशाची माणसीकता लक्षात येइल, महाराष्ट्रात एका वर्षांत 1701 बलात्कार होतात. त्यापैकी 1002 बलात्कार हे केवळ आठ मोठ्या शहरांमधील आहेत. महाराष्ट्र सीआयडीने तयार केलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील नागपूर, पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, अमरावती आणि अहमदनगर या केवळ आठ शहरांत मिळून 1002 बलात्कार होतात. याचाच अर्थ राज्यातील सुमारे 60 टक्के बलात्कार या आठ मोठ्या शहरांमध्ये होतात. उर्वरित 40 टक्के बलात्कार राज्यातील अन्य 24 जिल्हे मिळून आहेत.

महाराष्ट्र सिआयडी च्या आकडेवारी नुसार राज्यात महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा कायमच पेलत आहे, कोपर्डी घटनांच्या बाबतित मंत्रीमंडळ ऐकमेकांवर टिकास्त्र करण्यापेक्षा असे घडणाऱ्या घटनेला कसे थांबवता येइल, व प्रशासनाने महिलांच्या सुरक्षेचा कायदा कठोरतेने अंमलात कसे आनता येइल यावर विचार करण्याची अवश्यकता आहे, पुर्ण महाराष्ट्र पेटून उठतोय तरी मुख्यमंत्र्यांची बोलती बंद का असते, अजून मंत्री महोदयांनी आपल्या कमीटीं समवेत घटना स्थळी धाव का घेतली नसेल, पावसाळी अधिवेशनात विधानसभेत गाजत असलेल्या कोपर्डी प्रकरणवर मंत्र्यांनी अरोपींना कठोर शासन करून अन्यायग्रस्त कुठूंबाना न्याय मिळेल याकडे लक्षकेद्रीत करणे गरजेच आहे, अन्यथा पुन्हा महाराष्ट्र पेटून उठन्याची शक्याता आहे.  ((हा लेख दोन वर्षांपूर्वी घडलेल्या कोपर्डी घटनेवेळी लिहिल्या गेलं)

## "स्त्री शिक्षणासाठी झगडलेल्या महापुरुषांचा विसर... !"

प्राचीन काळापासून या देशातील बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित ठेऊन, आपल्या पूर्वजांवर गुलामी लादून आपल्या अस्तित्वाचा नायनाट केले, यास इतिहास साक्ष देत, बाल विवाह, सती पद्धत, महिलांना शिक्षण व हक्क हिरावून घेतलेला हा इतिहास आपल्या वाचनात असेलच.

या सर्व बाबींवर मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मोठी आमूलाग्रपणे क्रांती घडवून आणली, आणि आपल्या बहुजनांवर होणाऱ्या अन्यावर, अत्याचारावर आवाज उठवणारे महामानव होऊन गेले, त्यातच शैक्षणिक दृष्टीचा विचार केल्यास, गेल्या १०० ते १५० वर्षांपासून आम्ही शिक्षणाच्या प्रवाहात येत आहोत, त्या प्रवाहाला अजूनही आमचे समाज बांधव जोडलेले नाहीत, हा शिक्षणाचा अधिकार असे साधे सरळ मार्गे मिळाला नाही, तर त्यासाठी या देशाला महापुरुषांनी आपला रक्ताचा अभिषेक केला, स्वतःसाठी नाही तर या समाजासाठी झीजले, अनेक वर्षापासून स्त्री ही केवळ भोग वस्तू अशी समाजात रूढी निर्माण करून तिला चूल आणि मूल यातच गुरफटून ठेवले होते, अश्या अवस्थेत १८ व्या शतकात महिला शिक्षणासाठी प्रस्थापित व्यवस्थेशी लढा देत, महात्मा फुले दांपत्याने अंगावर शेण दगड झेलेले, मात्र स्त्रियांना चूल आणि मूल या पलीकडचे शिक्षण देऊन धर्म व्यवस्थेत बधिस्थ असलेल्या स्त्रियांना मुक्त केलं, १८४८ साली पुण्याच्या भिडे वाड्यात पहिली मुलींची शाळा सुरवात करून, देशातल्या पहिली महिला शिक्षिका सावित्रीबाई फुलेंनी हे कार्य अवगत केले, फुलेंच कार्य धर्म बुढवत आहे, अश्या धर्म व्यवस्थेतील

थोतांडांणी गरळ ओखणे सुरू असताना मात्र या विरोधाच्या परिस्थितीत फुले दांपत्य खचले नाही, शेवटच्या स्वासापर्यंत स्त्री स्वातंत्र्यासाठी लढत राहिले, आणि समस्त बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहाला जोडण्याचे कार्य हे आजच्या बहुजनांच्या अस्तित्वाचा पाया आहे...

पुढे शाहू महाराजांनी शिक्षण हे हक्काच व सक्कीचे करून बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात वाहून नेण्याचं कार्य केले, छत्रपती शाहू महाराजांच्या साम्राज्यात जो कोणी मुलांना शाळेत पाठवीत नाहीत त्यांना २ रुपये दंड फुकारून, त्यांनी या बहुजन समाजाला वर्षेनुवर्षं चालत आलेल्या गुलामीतून मुक्त करण्याचं कार्य व शिक्षणाच्या प्रवाहात वाहून नेण्याचं कार्य शाहू महाराजांनी केलं, बहुजनांच्या मुलांसाठी वसतिगृह त्यांच्या शिक्षणासाठी लागणारे साहित्य सर्व व्यवस्था महाराजांनी आपल्या खाजगी खरच्यातून केले, याच २०व्या शतकाच्या प्रारंभास शाहू महाराज तर इकडे कर्मवीर भाऊराव पाटलांनी बहुजनांच्या मुलांसाठी शिक्षण घेण्यास व त्यांना शेवटच्या स्वासपर्यंत प्रयत्न करणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९१९ रोजी ‘रयत शिक्षण संस्थेची स्थापना सातारा जिल्ह्यातील काले या गावी केली. भाऊरावांनी देशातले ‘कमवा आणि शिका’ या पद्धतीने चालणारे पहिले ‘फ्री ॲन्ड रेसिडेन्शियल हायस्कूल’ सातारा येथेच सुरू केले आणि त्याला नाव दिले ‘महाराजा सयाजीराव हायस्कूल’, स्वतःच्या दाढीच्या केसा एवढे विद्यार्थी मी शिकवणार अशी शपत घेऊन आज त्यांचं त्या रोपट्यांचे वटवृक्षात रूपांतर झाले, याच पार्श्वभूमीवर राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी आपल्या अभंग रचनेतून व जण प्रबोधनातून वेळो वेळी शिक्षणाचे महत्व समस्थ बहुजन समाजाला पटवून देण्याचं

कार्य त्यांनी केलं, "ज्यांनी मुलगा नाही शिकवीला तोही पापाचा भागीदार झाला, जैसे जन्म देणे कर्तव्य त्याला तैसे शिक्षण देणे अगत्याचे", या रचनेतून तुकडोजींच्या शिक्षणावरील काटकसर समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात नेण्याची जिद्द याची जाणीव होते, याच स्थितीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षे अस्पृश्यतेच्या व गुलामगिरीच्या खाईत लोटल्या गेलेल्या लाखो दलित - पीडितांचे पुनरुत्थान केले, शिका, संघटित व्हा, संघर्ष करा या ब्रीद वाक्याची उखलंन करून बाबासाहेबांनी भारतीय संविधानात शिक्षण हे जन्मसिद्ध हक्क आहे, सर्वसामान्यांसाठी शिक्षणाचे दारे उघडे केले, वरील महापुरुषांच्या वैचारिक दृष्टीकोनास आपल्या सबळ मेहनतीने, देशाच्या सर्वांगीण विकास हा केवळ शिक्षणामुळे होतो, माझा देश हा शैक्षणिक क्षेत्रात मागासलेला आहे, आणि देश्याच्या भवित्व्ह्यासाठी, बहुजन समाजाला शिक्षण सक्तीचे करणे बंधनकारक ठरवून, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. अशी उपाधी दिली....

यावरून सर्व महापुरुषांनी शिक्षणासाठी तडजोड केले, मात्र आजची परिस्थिती काही औरच आहे, इथे गरीब अति गरीब होत चालले आहेत आणि श्रीमंतांचे मजले वाढत चालेले आहेत, अश्या परिस्थितीत अनेक कुटुंब अडकून पडलेत, की आजही शिक्षणाचा घोट त्यांनी घेतलेला नाही, आर्थिक परिस्थिशी झुंज घेत, शिक्षणाच्या प्रवाहा पासून दूर लोटले गेले, ही परिस्थिती भयावह आहे, खाजगी शिक्षण, शहरी शिक्षण आणि स्पर्धेच्या युगात शैक्षणिक साहित्याची भरमसाठ भार हा परवडणारे नाही, अश्या परिस्थितीशी लढा देणाऱ्या, शिक्षणापासून दूर जाणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मूलभूत गरजातील काही आवश्यक गरजा पुरवठा होत नसल्याने, होतकरू, जिद्दी मुलांना शाळेची ओढ आहे मात्र परिस्थिती तिथे आड येथे

अश्या काही विद्यार्थ्यांच्या संख्येत आज भरमसाठ वाढ होत चालली आहे, अश्या अवस्थेत आपली सामाजिक बांधिलकी काय.?, आपल्या वरील झालेल्या अन्यायावर लढा उभारून आपल्याला आज शिक्षणाचा घोट देऊन गेले, परंतु आम्ही आज त्या शिक्षणाचा काय उपयोग करतोय? स्वतःच्या अस्तित्वासाठी, स्वार्थपणासाठी, माझं घर माझं बाळ, माझी बायको.. ! बस का या पुढे आपलं काहीही कर्तव्य नाही.. अशीच अवस्था निर्माण झाली, म्हणून म्हणतात ना, वारील महापुरुष एकदाच होऊन गेले या पुढे होणे कदापि शक्य नाही, आणि ते अगदी बरोबर आहे, बाबासाहेब म्हणायचे जो पर्यंत हा समाज मंदिरापुढील रांग, ग्रंथालया पुढे उभारणार नाही तो पर्यंत समाजात परिवर्तन होणे शक्य नाही, आजची अवस्था पाहता, मंदिरापुढील रांग काही कमी नाही उलट दान पेटी ही भरत आहे, मात्र एखाद्या अस्वस्त गरीब, होतकरू मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात नेण्यास मदत करणे शक्य नाही, कधी एखाध्या आश्रमात जाऊन त्यांच्या वेदना, दुःख समजावून त्यांच्या दुःखात सामील होण्यास जमत नाही, उलट स्वतःचे आई वडील वृद्धाश्रमात ठेवण्यास त्या वृद्धाश्रमाबाहेर रांगा लागत आहेत.. ही खेदेेची बाब आहे.. !

कोणतीही एखादी मोठी व्यक्ती सार्वजनिक जीवन कोणत्याही कारणाने सोडून गेली तर त्या व्यक्तीचे केवळ विचार मागे राहतात आणि हे विचारदेखील त्या त्या ठरावीक काळापुरतेच मर्यादित राहू शकतात, हे आजच्या परिस्थितीवरून ठळकपणे उमटून दिसत आहे...

## आश्रम शाळा बनले लैंगिक शोषणाचे अड्डे... !

दुर्गम भागात राहणाऱ्या अधिवासी जमातीं मुख्य प्रवाहात यावं यासाठी सन १९६२ साली, आदिवासी विकास विभागाची आश्रम शाळेची स्थापना करायची संकल्पना उदयास आली, या मुळे दऱ्या, कपारीत राहणाऱ्या, पाली व बेड्यांवर जीवन जगणाऱ्या गोरगरीब आदिवासींच्या मुला-मुलींना शिक्षणाची सोय होऊ लागली, परंतु, मस्तवाल 'व्हाईट कॉलर' नराधमांनी या आश्रम शाळा म्हणजे लैंगिक शोषणाचे अड्डे बनविले. आदिवासींच्या चिमुकल्या मुलींना आपल्या वासनेची शिकार करून हे नराधम सरकारच्या चांगल्या धोरणाला काळिमा फासत आहेत.

आदिवासी मुलींच्या लैंगिक शोषणाने ऐन दिवाळीत महाराष्ट्राच्या मनाला प्रचंड वेदना झाल्यात. बुलडाणा जिल्ह्यातील पाळा येथील आदिवासी आश्रम शाळेत उघडकीस आलेल्या या घटनेनंतर राज्यभरातील आश्रम शाळांतही जे काही सुरू असेल, त्याची जाणीव प्रत्येकाच्या मनाला वेदना देऊन गेली. तब्बल ११ अल्पवयीन मुलींचे शाळेच्या मुख्याध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लैंगिक शोषण केले. चौथी ते सातवीच्या मुलींवर अमानुष असे बलात्कार झालेत. कदाचित या प्रकरणामागे मोठे सेक्स रॅकेट कार्यरत असावे. त्याद्वारे या मुलींवर कुणी कुणी लैंगिक अत्याचार केले असेल याची कल्पनाही करता येत नाहीत. या आश्रमशाळा आहेत की बेशरमांनी आपली वासना शमविण्यासाठी उघडलेले कुंटणखाने आहेत, असा प्रश्न मात्र सर्वांना पडणे साहजिकच आहे.

महाराष्ट्रात एक नव्हे तर असे कित्येक आश्रम शाळा आहेत कि, आज या अत्याचाराच्या जाळयात फसले आहेत, कित्येक निरपराध, निरागस, कोमल वयाच्या शरीराला या नराधमाच्या वासनेच्या बळी पडत आहेत, याच अंदाज देखील येत नाही, दुर्गम भागातील, जेकी अजूनही शैक्षणिक रित्या मुख्य प्रवाहात प्रवेश केले नाहीत, दारिद्र रेषेखालील जीवन जगणाऱ्या गोरगरीबांच्या आणि उघड्यावरील लोकांच्या मुली या मस्तवाल नराधमांच्या वासनेच्या शिकार बनत आहेत. अठराविश्व दारिद्य्र, भीषण आर्थिक दैनावस्था आणि सामाजिक उपेक्षितपणा वाट्याला आलेल्या या समाजाच्या मनावर आणखी किती आघात करणार आहात? बोटावर मोजण्याऐवढ्या आश्रम शाळा सोडल्या तर बहुतांश आश्रम शाळांमध्ये पिण्याचे पाणी, पोषण आहार, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांची बोंबाबोंब आहे. या सर्व सुविधा केवळ कागदांवर दाखवून सरकारचे अनुदान तेवढे उचलले जात असल्याचे धक्कादायक वास्तव आहे. आश्रम शाळांच्या तपासणीसाठी महिला व बाल कल्याण विभागाचे अधिकारी शाळेवर जातात की नाही हादेखील मोठा प्रश्न आहे, गतवर्षी "टाटा सामाजिक संस्थेने", केलेल्या आश्रम शाळेची तपासणी, व त्या तपासणीत आलेला निष्कर्ष त्यानी आदिवासी विकास विभागाला, अहवाल पाठवला होता, तो अहवाल या आश्रम शाळेची दुर्दशा दर्शवते, त्या अहवाला नंतर देखील शासनाचे कुठल्याच यंत्राने याचा तपास घेतला नाही हा खेदेची बाब आहे.

गतवर्षी दिलेल्या "टाटा सामाजिक संस्थेच्या ", आहवाहला नुसार, गेल्या चार वर्षात, आदीवासी आश्रम शाळेलच्या हलगर्जी पणा व गैरसोईमुळे तब्बल ३८५

विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे, अश्या अवस्थेत प्रशासन आपले यंत्राने व त्याची अंमलबजावणी व्यवस्थीत करते असे कसे म्हणू शकता, पुढे महाराष्ट्र भारत असलेल्या अनुदानित व शासकीय आश्रम शाळेत निम्याहून अधिक महिला अधिक्षका नाहीत, ते पदे अजूनही प्रलंबित आहेत, हे बाब चिंताजंनकच म्हणावे लागेल, आश्रम शाळेत वाढत्या लैगिक शोषणाचा हा मूलभूत करणं असणे साहजिकच आहे, मुलींचा सांभाळ व योग्य रित्या त्यांच्याकडे लक्ष केंद्रित करणे व मूलभूत सुविधा त्यांच्या पर्यंत पोहचवणे हे कार्य महिला अधीक्षकांच नव्हे का, मग तेच जर पदे इथे रिक्त असतील तर वाढत्या अत्याचाराचा मूळ गाभा, कोणता असेल? ते वाचकानी समजून घ्यावे. पुढे अहवालात महाराष्ट्रात २४३ शाळेत मुलांसाठी तर १८२ शाळेत मुलींसाठी वयक्तिक स्नानगृह नाहीत, १७२ शाळेत मुलींसाठी वयक्तिक शौचालय नाही तर १८६ शाळेत मुलांसाठी वयक्तिक शौचालय नाहीत. शाळेना अनोळखी बाहेरील व्यक्ती किंवा जनावरे आत येउ नये म्हणून शाळेभवती कंपाउंड वॉल (सुरक्षा भिंत) उभी करणे हे बांधनकारक आहे, मात्र महाराष्ट्रातील तब्बल ३९२ शाळेना हे भिंती उपलब्द नाहीत, बाहेर व्यक्तीची विचारपूस होत नाही, अश्या अवस्थेत हे सर्व काही घडणे साहजिकच आहे.

प्रशासन वर्षाकाठी करोडो रुपयांचं अनुदान या शाळेना पुरवतो मग, हे अनुदान कुठे खर्च केले जाते यात बेतच नसतो, शैक्षणिक सुविधा, सुरक्षेची हमी, जेवणाची व्यवस्था, पाठ्यपुस्तके हे सर्व काही त्या अनुदानातं येतो, परंतु आजच्या या वाढत्या लैगिक अत्याचारांवरून हि अनुदान केवळ भ्रष्टचारात व ठेकेदारांचे खिसे भरणे एवढ्या पुरतं मर्यादीत दिसते, हे वरील टाटा सामाजिक संस्थेने दिलेल्या अहवालावरून जे काही आकडेवारी दर्शवली आहे ती आकडेवारी गतवर्षीची असून

त्यात अजूनही वाढ झाल्याची े दिसते मात्र यात सुविधा व शासकीय यंत्रणांची अमलबजावणी मात्र झालेली नाही, यावरून असे म्हणावे वाटते हा दुर्गम भागात राहणारा आदीवासी समाज या अश्या अन्याय अत्याचारांना सामना किती दिवस करत राहणार, आणि हा प्रशासन किती दिवस मौन धारेत असेल, मार्टिन लूथर किंग यांचे एक विधान अत्यंत वस्तुनिष्ठ आहे. ते म्हणाले होते की, दृष्टांच्या वाईट कर्मापेक्षा सज्जनांचे मौन अधिक धोकादायक असते. मग फडवणीस सरकार सज्जनांचे आहे तर ते मौन धारनेत असणे हे धोकादायक नव्हे का.

## "स्वतंत्र देशातील स्वतंत्र महिला वर्ग... !"

स्त्री, अबला, नारी, महिला, रमणी, कामिनी, कान्ता, सुंदरी, औरत, वनिता, अश्या अनेक शब्दांनी ओळखल्या जाणाऱ्या भारतीय महिला, आज जागतिक महिला दिन या अनुषंगाने महिलांच्या स्वतंत्र, हक्क, व्यवस्थेतील समानता, कुटुंबातील दुभाजता, समाजातील मान सन्मान आणि राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अस्तित्व, यावर थोडं विश्लेषण करु.

हजारो वर्षांपासून असलेली स्त्री शिक्षणाचा, स्त्रियांच्या अधिकाराचा, गुलामीत जगणे, समाजात स्त्री म्हणजे एक भोग वस्तू अशी तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन, धार्मिक अंधकारात असलेल्या व चूल आणि मूल या पलीकडचं जग दर्शन घडवण्यसाठी सर्व प्रथम १९ व्या शतकात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंनी आपलं अस्तित्व पणाला लावले, व या भारतात सर्वात पाहिल मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र शाळा काढले, तरचं आज कुठे आमच्या महिला उच्च शिक्षण घेऊ लागले, क्रीडा, राजकीय, शैक्षणिक तसेच अनेक क्षेत्रात आपलं अव्वल स्थान मिळवत आहेत, मात्र याचे सर्व श्रेय क्रांतिकारक फुले दाम्पत्याला जाते, हे आजच्या समाजाला विसरून चालणार नाही. हक्कापासून, शिक्षणापासून बंदिस्त असलेल्या स्त्रियांना या जगात स्वतंत्र पणे वावरण्याची मुक्तता दिले, परंतु पुढे विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर यांनी या महिलांसाठी ४ वर्ष १ महिना २६ दिवस आपल्या आयुष्यातील खर्चून, "हिंदू कोड बिल" लिहिले, दुर्दैवाने हे विरोधकांनी

कायद्यात सामावून न घेता फेटाळून लावले, मात्र बाबासाहेब आंबेडकरांनी या साठी आपल्या कायदामंत्री पदाचा राजीनामा दिला याची जाणीव सर्वांना असणे गरजेचे आहे, पण बाबासाहेबांचे कष्ट निरर्थक ठरले नाहीत. ज्या कायद्याला विरोध करण्यात आला होता तो १९५५-५६ ला चार वेगवेगळ्या कायद्यात विभाजून हिंदू कोड बिल ला मजुरी दिली, आणि हा कायदा म्हणजे "महिलांच्या अस्तित्वाच वज्रमूठ आहे, महिलांवर होणाऱ्या प्रत्येक शोषक जाचिंचा विचार करून बाबासाहेब आंबेडकरांनी हे कायदा करून महिलांना स्वतंत्र मिळवून दिले, या कायद्यांनी स्त्री-पुरुषांच्या दर्जात कायद्याने समानता प्रस्थापित केली. हेही आजचा महिला वर्गांना विसरून चालणार नाही. अश्या महापुरुषांच्या उपकारांची आजच्या वर्गाला विसर पडत चालला आहे.

माँ साहेब जिजाऊ, ताराराणी, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, रमाई सारख्या त्यागी नारिणी महिलेच्या अस्तित्वाची ओळख इतिहासात नोंद करून दिली. मात्र दुर्दैव या महाराष्ट्राच महिलांना आजही तुच्छ लेखतांनाचे चित्र दिसून येते, तसे म्हणायचे तर गेल्या काही वर्षापासून दहावी बारावी व उच्चशिक्षित पदव्यांचा निकाल पाहिलं तर मुलींच अग्रस्थानी आहेत, मुलींचा गुणवत्तेत कुठे कमतरता भासत नाही, परंतु शिक्षणाचे दारे लवकरच बंद होतांना दिसत आहेत. महिलांनी अनेक क्षेत्रात आपलं वर्चस्व निर्माण केले आहेत, कला, क्रीडा, शास्त्रज्ञ, अगदी राजकारणात देखील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कन्या इंदिरा गांधी यांनी १९ जानेवारी १९६६ साली भारताच्या पहिल्या स्त्री पंतप्रधान म्हणून जगासमोर आल्या, महाराष्ट्राची प्रतिभा ताई पाटील यांनी २००७ साली भारताचे पहिले महिला राष्ट्रपतीचा गौरव मिळवील्या, उत्तरप्रदेशचे पहिली महिला राज्यपाल सरोजिनी नायडू, पहिली भारतीय महिला महापौर सुलोचना मोदी, त्यानंतर तामिळनाडू, राजस्थान, पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश व पश्चिम

बंगाल या राज्यांना स्त्री मुख्यमंत्री लाभल्या. पण अद्याप महाराष्ट्राला स्त्री मुख्यमंत्री होण्याचे भाग्य अजूनही लाभलेले नाही. महाराष्ट्रात महिलांना राजकारणापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न समाजव्यवस्थेने नेहमीच केला आहे. ५० टक्के आरक्षण वाट्याला असूनही मुख्यमंत्रीपदाची धुरा सक्षम स्त्री राजकारणी सांभाळण्यासाठी अद्याप कोणतीही महिला पुढे का येऊ शकली नाही? हा प्रश्न पडला आहे. प्रस्थापित ऐकविसाव्या शतकाचा विचार केल्यास स्त्रियांना राजकारणातून क्रमप्राप्त करण्यात येत असल्याचेच चित्र निदर्शनास येत आहेत, अनेक ठिकाणी स्त्रियांना केवळ आरक्षणाच्या नावाखाली निवडणूक लढवायच आणि पूर्ण कारभार पुरुषांनी सांभाळायचं, स्त्री केवळ नामधारी सत्ताधीकारी, व्यवस्था सर्व पुरुष प्राधान्याने चाले, अश्या प्रकारे स्त्रियांना स्वतंत्रता मिळत नाही.

राजकीय दृष्टीकोना पलीकडे स्त्रियांना सामाजिक जीवनात कितपत स्वतंत्र आहे याचा ही विचार येतो, स्त्रियांवरील अत्याचार, बलात्कार सारखे प्रकारणांनी अख्खा देश हादरवून सोडले, दिल्लीत झालेल्या निर्भया प्रकरण असो वा कोपर्डी प्रकरण या प्रकरणानंतर देश्यात एका ज्वालामुखी सारखे उद्रेकनारे मोर्चे, आंदोलनने निघाले, अनेक महिला रस्त्यांवर उतरले, मेणबत्त्या पाजळले, मराठा क्रांती मोर्चा सारखे ऐतिहासिक मोर्चे निघाले, आत्ता वाटलं न्याय मिळेल महिला रस्त्यावर उतरले म्हणजे त्यांच्या अस्तित्वाचे, त्यांच्या स्वातंत्रेचे दिवस पाहायला मिळतील अत्ता देशातील महिलांवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना कठोर शिक्षा होईल की जेणे करून पुढची पुढी त्या विचारांचा पाईक होणार नाही, महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलेल, रात्र बे रात्र रस्त्यावरुन घरी परतणाऱ्या माझ्या आई

बहिणींना अत्ता या भावाचा आसरा मिळेल, प्रत्येक स्त्री सुखरूप घरी परतेल, मात्र झालं काय हे सर्व आश्वासने उरली, बोलण्यासाठी आणि लेखांतून निदर्शनासाठी हे ओळी केवळ कागदोपत्री उरले, बाकी काय त्या महाभारतात द्रौपदी व रामायणात सीतेला अग्निपरिक्षा चुकले नाही, आणि या स्वतंत्र देशात महिलांना या समस्येला तोंड देणे चुकत नाही, देश्यात वयवर्षं तीन पासून ते सत्तर वर्षच्या वृद्ध महिला या कर्मठ विचारसरणीच्या पुरुषांच्या हातून सुटले नाहीत.

परस्त्री मातेसमान मानणाऱ्या छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र, पराविया नारी आम्हा रुखमाई समान म्हणनाऱ्या संत तुकोबांचा महाराष्ट्र, स्त्री शिक्षणासाठी आपलं अस्तित्व मिठवणाऱ्या फुले दाम्पत्यांचा महाराष्ट्र, स्त्री-पुरुष समानतेचा घटना लिहणारे बाबासाहेबांचा महाराष्ट्र, अश्या महाराष्ट्रात आज स्त्रियांना शैक्षणिक, क्रीडा, राजकीय व सामाजिक क्षेत्रात आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी कुठेतरी समाज कमकुवत आहे, हे स्त्री-पुरुषांच्या आतील दरी दूर होईल का हा या प्रस्थापित व्यवस्थेशी माझा प्रश्न.?स्त्रियांच्या अस्तित्वासाठी स्त्री स्वतः रस्त्यावर येईल का, आणि यासाठी हा समाज कितपत प्रयत्नशील असेल हाही तितकाच महत्वाचा..

# "स्त्री अस्तित्वाची ज्योत - सावित्रीबाई फुले"

क्रांतीज्योति सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त महाराष्ट्र भरात बालक दिन म्हणून उत्साहात साजरी केले जाते, त्या अनुषंगाने त्यांच्या कार्याचा व त्यांच्या विचारांचा जागर या महाराष्ट्रात होतोय का, महिलांच्या स्वतंत्रासाठी, शिक्षणासाठी ज्यांनी रक्त सांडले त्यांच्या विचारांचा अस्तित्व, स्त्री स्वातंत्र्याची ज्योत आजही पेटती आहे का? असा प्रश्न माझ्या सारख्या एका सामान्य माणसाला पडणे सहजीकच आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याचा उलघडा करणे म्हणजे स्त्री स्वातंत्रांचा अस्तिवाची जाणीव करणे होय, खर तर आजच्या वैज्ञानिक युगात हा समाज इतका शिक्षित झाला, की त्यांचे पाय जमिनीवर कधी येतच नाहीत, स्त्रियांच्या शिक्षणाचा विचार केल्यास शैक्षणिक, राजकीय, क्रीडा अश्या अनेक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतल्याचे दिसते, मात्र आज जी स्त्री या समाजात स्वतंत्रपणे वावरत आहे, आज प्रत्येक क्षेत्रात आपली भूमिका बजावत आहे या सर्वाच श्रेय महात्मा फुले दांपत्याला जाते, मात्र खंत या गोष्टीची वाटते खऱ्या विध्येची देवता असलेल्या क्रांतीज्योती सावित्री बाई फुलेंकडे या समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन नाहीच.

ज्या व्यवस्थेत बहुजन समाजाला शिक्षणाचा अधिकार नव्हता, ज्या व्यवस्थेत स्त्रियांना काही कठोर कायद्याचा बंधनात अडकवले होते, स्त्री म्हणजे केवक भोग वस्तू, स्त्रीयांना चूल आणि मूल या पकीकडे कुठलाच अधिकार स्वीकारता येणार नाही, शिक्षणाचा अधिकार, स्वतंत्रेचा अधिकार, विधवा माहिलेवरील अत्याचार,

बालविवाह, अश्या अनेक बंधनात अडकलेला हा स्त्री समाज, अश्या अवस्थेत एकोणीसाच्या शतकात असा एक द्रूव तारा जन्माला आला, की समस्थ बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी आपलं अस्तित्व पणाला लावले, ते म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले, बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून ते अतिशय अस्वस्थ होत असत. ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा त्यांनी निश्चय केला, हा दारिद्र, गुलामी ही केवळ आशिक्षतेमुळे होत असल्याचे त्यांच्या एका काव्याच्या ओळीतून आपल्याला पाहायला मिळते.

विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली ।

नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले । वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

या समाजाला जर गुलामीतून मुक्तता मिळवायचे असल्यास सर्वप्रथम शिक्षणाची कास धरणे हाच खरा उपाय आहे, आणि हाच गुलामी वरील प्रहार आहे, ज्योतिबांनी मानवी जीवनात शिक्षणाला खुप मोठं स्थान दिले आहेत, त्यातच स्त्री शिक्षणासाठी आपलं अस्तित्व देखील खर्ची घातले, १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात देशातील पहिली मुलींची शाळा सुरवात करून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, स्त्रीयांना शिक्षण म्हणजे महिला शिक्षिका लागते अश्या चिंतेत असतांना पत्नी सावित्रीबाई फुले आपल्या पतीच्या सहकार्याला, त्यांच्या सामाजिक कार्यात खांद्याला खांदा लावून कार्य करण्याची जिद्द दाखवली, महात्मा फुलेनी सावित्रीबाई ला एखाद्या ज्वारीची बियाणे मातीत पेरल्यावर त्याच उगवण हे रोपट्यात, झाडात व त्या झाडाला कणसं येत आणि जो पेरलेलं बियाण आपलं अस्तित्व मिटवून कणसंरुपी अनेकांना घडवते, अश्या उदाहरणानी सावित्रीबाईंना प्रेरित करत समाज कार्यात स्त्री

असल्याचा कुठलाच भेदभाव नठेवता प्रस्थपित व्यवस्थेशी झुंज घेण्यास उभा केलं, पती कडून अक्षर ओळख करून घेऊन स्वतः मुलींना शिकवण्या सज्ज झाली, सावित्रीबाई देश्याच्या पहिल्या महिला मुख्याध्यापीका बनल्या, या यशस्वी शाळेचे स्वागत सनातनी उच्च वर्णीयांनी "धर्म बुडाला, जग बुडणार, कली आला. " असे सांगून केले. सनातन्यांनी विरोध केला. अंगावर शेण फेकले. काही उन्मत्तांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. अनेक संघर्ष करत हा शिक्षणप्रसाराचा उपक्रम चालूच राहिला, सावित्रीबाई अश्या धमक्यांना डगमगल्या नाहीत, शाळेत जाताना अश्या कर्मठ लोकांनी अंगावर शेण दगड फेकले असता अंगावरचे घाण झालेले कपडे बदलून पुन्हा या समाजाला लागलेल्या गुलामीच घाण काढण्यासाठी शाळेत शिकवू लागल्या, स्त्रीयांना केवळ शिक्षणच नाहीतर प्रत्येक क्षेत्रात समानता मिळण्यासाठी त्यांनी झगडले, स्त्रियांचे मनोबल वाढवण्यासाठी त्यांनी कार्य केले, बाल जठर विवाह पध्दतीमुळे वयाच्या ११-१२ वर्षात मुली विधवा होऊ लागल्या अश्या विधवा मुलींना एकतर सती जावे लागले नाहीतर केशवपन करून कुरूप बनवले जाई, स्वातंत्र्याची हक्क नसल्याने ही स्त्री एखाद्या नराधमाचा शिकार होत असे, आणि समाज गरोदर विधवा म्हणून छळ करत असे, अश्या अवस्थेत या महिलापुढे जीव देणे नाहीतर भ्रूणहत्या करणे हाच पर्याय असे, अश्या अवस्थेत जोतिबांने बालहत्या प्रतिबंधक गृह सूर केले, आणि त्यास सावित्रीबाईनी समर्थकपणे चालवल्या, त्यात जन्माला येणार सर्व बाळांना मायेची उब दिली, त्यातच काशीबाई नामक एका ब्राम्हण विदवेची मूल सावित्रीबाई फुलेंनी दत्तक घेतले, त्यांचं यशवंत अस नामकरण केले, तोच यशवंत पुढे चालून डॉक्टर झाला.

इ. स. १८९६-९७ दरम्यात पुणे परिसरात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला होता, हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेऊ लागला. ब्रिटीश सरकारने या रोगीना वस्ती पासून लांब स्थलांतरित करून खबरदारी चे पाऊल उचलले असता, यातून उद्भवणारे हाल ओळखून सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेग झाला. त्यातून १० मार्च, इ. स. १८९७ रोजी त्यांचे निधन झाले.

आशा स्त्री शिक्षण त्याच बरोबर स्त्री अस्तित्वाची जननी असलेली क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले हे आपल्या समाज कार्याचा ध्यास शेवटच्या स्वासपर्यंत खांद्यावर पेलली, पतीच्या खांद्याला खांदा लावून स्त्री शिक्षणासाठी झगडणारी ही नारी आपल्या पतीच्या कार्याच कौतूक करतांना त्यांच्या एका ओळीत सापडत.

**काळरात्र गेली। अज्ञान पळाले।।**

**सर्वा जागे केले। या सूर्याने ।।**

**शूद्र या क्षितीजी। जोतिबा हा सूर्य ।।**

**तेजस्वी अपूर्व। उगवला।।**

अश्या स्त्री शिक्षणाचे मुहुर्तमेड रवणारी नारी, विधेची खरी दैवत, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला व कर्तृत्वाला सलाम..

# "प्रस्थापित व्यवस्थेशी लढणारी नारी- माँ साहेब जिजाऊ"

हिंदवी स्वराज्य संकल्पक, आपल्या संस्काराने जिने एक नव्हे तर दोन दोन छत्रपती घडवणारी रणरागिणी राष्ट्रमाता, राजमाता माँ साहेब जिजाऊ, स्त्री स्वतंत्र व स्त्रियांच्या अस्तित्वाचा इतिहास निर्माण करणारी रणरागिणी.

याच महाराष्ट्राला ज्यांनी आपल्या रक्ताने अभिषेक करून, उद्याचा स्वराज्य हा ना कुठल्या आदिलशाहीचा असेल ना कुठल्या मोगलशाहीचा, हा स्वराज्य रयतेचा, लोककल्याणकारी जनतेचा, स्त्री स्वतंत्रेचा, शिवशाहीचा असा ठामपणे आपल्या हृदयी बाळगून जिने हे स्वराज्यांचे स्वप्न आपल्या संस्काराने वीर छत्रपती शिवाजी व संस्कृत पंडित छत्रपती संभाजी सारखे दोन बलाढ्य वाघांना घडवून ते स्वराज्याचे स्वप्न साकार करूनच या मातीत विलीन झालेले आऊसाहेब, माँ साहेब राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या पराक्रमाचा, यांच्या त्यागाचा, त्यांच्या संस्काराचा, त्यांच्या धाडसी नेतृत्वाचा, त्यांच्या स्वराज्य पेरण्याच्या संलकल्पणेचा पाडा हा अवघ्या महाराष्ट्राला ठाऊक आहे.

सिंदखेडराजा येथील जाधव घराण्यातील लखुजी राजे जाधव यांच्या पत्नी म्हाळसाबाई यांच्या पोटी १२ जानेवारी १५९८ रोजी जिजाऊंचा जन्म झाला, राजघराण्यातील कन्या असल्याने अक्षरओळख तसेच घोडेस्वार, तलवार बाजी, संकटप्रसंगी स्वतः बरोबर या मातीच्या रक्षणासाठी मैदानी सर्व युद्ध कलेचं प्रशिक्षण घेतली, लखुजीने मुलगा-मुलगी असा भेदभाव नठेवता प्रत्येक गोष्ट जिजाऊंना शिकवलं, जिजाऊंना पाळण्यातच आपल्या पिताच्या पराक्रमाची पोवाडे ऐकायला

मिळाले, त्याच बरोबर पारतंत्र्याची जाणीवही होऊ लागली, गुलामी, रायतेवरचा अन्याय या वर विलक्षतेणे जिजाऊ वेळोवेळी जाणवत असे, पुढे १६०५ साली दौलताबाद येथे भोसले घराण्यातील मालोजी राजे यांचे चिरंजीव शहाजीराजे भोसले यांच्याशी अगदी थाटामाटात विवाह सोहळा सम्पन्न झाला, मात्र कार्यक्रमात हत्तीच्या धुमाकूळाने त्यास आवर घालण्यासाठी दोन गट निर्माण झाले व यातच भोसले-जाधव यांच्यात मतमतांतरे होऊन राजकीय वैर सुरू झालं, जिजाऊ अवघी ७ वर्षाची आपल्या पतीशी एकनिष्ठ राहून आपल्या माहेरशी संबंद तोडून निघून गेले, मात्र वैर काही शांत झालेलं नव्हतं, यातच शाहजी राजे दूर कर्नाटकात आदिलशाही च्या कार्यकिर्दीत कार्य करत, जिजाऊ माहेरच कुटुंब व आपल्या पतीच्या आश्रयापासून दूर असूनही जिजाऊ कधी खचले नाहीत, मी स्त्री आहे या समाजात एकटी जगू तरी कसं या भीतीपोटी कधी हार मानले नाहीत, उलट जगण्याची व या मातीच रक्षण करण्याची, पारतंत्र्यावर मात करण्याची नेहमीच मनामध्ये उखळत स्वराज्याचे तक्त पेलत आपल उभं आयुष्य या स्वराज्याच्या रक्षणासाठी लावण्याचे ती जिद्द इतिहासाच्या पाणापणात सापडते, पाहता पाहता दिवस लोटले जात होते, शहाजी राजे कधी मधी पुरसत मिळताच जिजाऊंना भेटण्यासाठी येत असत, पुन्हा सुर्यस्था सारख जिजाऊंच्या आयुष्यात काळोख दाटलेला अंधार पसरत असे, आपल्या पहिल्या मुलगा संभाजी तिकडेच शहाजीराजे सोबत कर्नाटकात वास्तव्यास होते, काही काळ लोटता, दिवस उजडला १९ फेब्रुवारी १६३० चा जिजाऊ पोटी एक शूर वीर महापराक्रमी, स्वराज्यांची समशेर जणू मातृगरबातुनच घेऊन आला असा राजा शिवबाचा जन्म झाला, आणि बाळ शिवाजींना वाढत्या वयाप्रमाणें संस्काराणे, महापराक्रमी योध्यांचे कथे, पिताश्री शहाजीराजेंची महापराक्रमी गाथा, आणि

भोसले-जाधव घराण्यांतील वैर्य याच बरोबर स्वतःच रक्षणासाठी व या मातीच्या उज्वल भविष्यासाठी, रयतेवर होणाऱ्या अन्यायावर आवाज उठवण्यासाठी, रयत पारतंत्र्यात, गुलामीत जगत असतांना त्यावर स्वतंत्र मिळवण्यासाठी मैदानी खेळ, तलवारबाजी, घोडेस्वारी खुद्द जिजाऊ शिवबाला शिकवले, राजा-रयत, उच्च - निच्छता, जात-पात यात काही फरक नाही, आणि ते जिजाऊंच्या स्वराज्य संकल्पनेत थारा नव्हता. म्हणून शिवबाला रयतेच्या गोरगरिबांच्या मुलांसोबत मैत्री करून, त्यांच्या घरची कांदा भाकरीची चव खाण्यास ते संस्कार जिजाऊंचे पहायला मिळतात, जिजाऊ ने पाहिलेले स्वराज्याच्या स्वप्नासाठी कधी होमहवन केलं नाही, कधी उपास तपास केला नाही, जिजाऊ प्रयत्नवादी होते, दैववादी नाही, शिवबालाही प्रयत्नवादी संस्कार दिले, १४ वर्ष्याच्या शिवबाच्या हाती शाहजी राजेंनी पुण्याचा प्रांत दिला, बाळ शिवबाला जिजाऊ पुण्याच्या मातीत घेऊन गेली, सर्व वस्ती जाळून राख झालेली, कुठेतरी एक पहार त्या वर फुटक मडकं, फितवा निघाला होता या या प्रांतात जो वस्ती करेल त्यांचा निर्वाश होईल, मात्र जिजाऊ डगमगल्या नाही, तीच पहार त्या मातीतून उचलली आणि त्याच मातीत बाल शिवबाच्या हाती सोन्याचा नागर फिरवली आणि दऱ्या खोऱ्यात लपून बसलेल्या रयतेला पुन्हा या जिजाऊंनी हाक दिली, "माझ्या रयत बांधवांनो या आपलं वस्ती पुन्हा निर्माण करा, जो कोणी आड येईल त्यांचा निर्वाश करण्यासाठी अत्ता शिवबा आलाय", आणि अश्या नेतृत्वाने माँसाहेब जिजाऊ आपल्या शिवबाला वेळोवेळी शत्रूशी जुंझ घेण्यास मार्गदर्शन दिले, वेळप्रसंगी स्वतः शत्रूवर चालून गेले, माणसे जोडले, मावळे जोडले, महिलांना देखील पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून संघर्ष करण्याची, एक महिलांचा स्वतंत्र फौंज निर्माण केली, स्वतः बरोबरच स्वतःच्या मातीच्या रक्षणासाठी मावळयांना एकनिष्ठ

होण्यास सार्थ केलं, माँसाहेब जिजाऊ संकट प्रसंगी स्वतः स्वारीवर जात असे, युद्ध मैदानात उतरत असे, कधी स्त्री असल्याची भेदभाव नठेवता, अनेक वेळप्रसंगी जिजाऊ हाती तलवार घेत, शिवाजीराजे ज्यावेळेस आग्राकैदेत होते, तेंव्हा महाराष्ट्रातील इंचभर भूमी देखील मिर्जाराजा जयसिंगला जिंकता आली नाही. कारण त्यावेळेस स्वराज्याची सुत्रे जिजाऊमातांच्या हाती होती. म्हणजे जिजाऊंमातांची जरब कशाप्रकारे होती हे यावरून स्पष्ट होते. शहाजीराजांचा म्रुत्यू झाला त्याप्रसंगी जिजाऊ सती गेल्या नाहीत, म्हणजे जाधव-भोसले घराण्यात सतीप्रथा तर नव्हतीच पण जिजाऊमाता देखील सतीप्रथेच्या विरोधात होत्या. आज २१ व्या शतकात जिजाऊमातेच्या पुरोगामी विचारांची गरज आहे. जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली शिष्टमंडळ स्थापले, राज्यकारभार सुरू झाला, रयत आनंदी नांदू लागली, शिवबा रयतेचा राजा झाला, शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांच्या, लोककल्याणकारी राजा झाला, अश्या प्रकारे जिजाऊंच्या संकल्पनेतला स्वराज्य उभा राहिला, ६ जून १६७४ ला रायगडावर थाटामाटात शिवाजी राजेंचा राज्याभिषेक सोहळा संपन्न झाला, आणि शिवबा राजे रयतेचे छत्रपती झाले, ही संकल्पना ज्या जिजाऊंनी मांडून आपलं उभं आयुष्य तलवारीच्या टोकांवर काढले शिवबाला छत्रपतीच्या गादीवर बसवून आपली संकल्पना सत्यात उतरवून राज्याभिषेकाच्या नंतर १२ दिवसांनी राष्ट्रमाता राजमाता माँ साहेब जिजाऊंनी पाचाडला आपला अखेरचा स्वास घेतला, अन या स्वराज्याला पोरका करून गेले, अश्या विरपराक्रमी माँ साहेब जिजाऊ यांच्या चरणी अभिवादन...

# अस्पृश्य कुटुंबातील स्त्री ( कथा).

अस्पृश्य जमातीची वस्ती म्हणून गावापासून लांबवर वसलेल्या वस्तीतला बाबु, जन्म च दारिद्र्यात झाल्याने जणू आपलं कुटुंबच दारिद्र्याशी जुळलेला हा एक उदाहरण, ही कथा काल्पनिक आहे...

बाबू, दिस भर गावातील पुढारी वतनदाऱ्यांच्या शेती लागलेलं काम स्वाभिमानाने करतो, अशिक्षणीत कुटुंब असल्याने अजूनही मूलभूत हक्काची जाणीव नाही, पोटी दोन मुली, एक मुलगा असे एकूण चार जणांचा कुटुंब बाबू वर अवलंबून आहे, आई वडील लवकरच दूर झाल्याने बांबूवर ही जबाबदारी अगदी लहानपणापासून जोपासल्या गेली, बाबूची पत्नी जनाबाई आपल्या कडी मेहणतीने धणीच्या खांद्याला खांदा लावून काम करते, दिस भर कामा विना पोटाचा खिनगी भरणा अशी अवस्था या कुटुंबाची, मुलगा जेमतेम बारा वर्षचा झालं, त्याला शाळेत पाठवून खूप मोठं मास्तर करावा अशी या बाबू ची इच्छा, शाळेचे दिस सुरू झाली तोवर बाबुला मुलाच्या शिक्षणाची लैय घोर पडली, शाळा सुरू झाली म्हणून बाबू, जना ला म्हटला, 'जने आपल्या बाळयाला लय शिकवायचं बर का, अत्ता उद्या पासन त्याची शाळा सुरू होते, ते गावातला मास्तर म्हटला पोराला शाळेत पाठव, पोरग शाळेत जातं म्हटल्याने त्याला दप्तर, वह्या, पुस्तके, पेनी लागतीलच की", तेवढ्यात जना म्हटली, "अहो घरात रुपया नाही बगा त्याला कुठून आणणार दप्तर, म्या काय म्हणतो, ये शाळा बिळा आपल्या ची न्हाय, दोन पोरी लग्नाला आल्या ह्याला शिकवीत बसला तर पोऱ्याचं लग्न कोण करावं, त्याला उगी शहरात कापड दुकानात पाठवा कमाला, ते जनार्धनाच पोरग बघा किती लहान असून महिना दोन हजार देत्यात

त्याला, आपल बाळया ही आठवी गत शिकलाच की, त्याला बी देतील दोन तीन हजार, उगी याला कुठे तरी लावा कामाला", म्हणत जना वसरी सारवणीच्या कामात मग्न झाली, बाबू नाराज होऊन आज कुठे काम काही लागत का म्हणून गावात गेला, गावातला चावडीवर बसलेल्या वयवृद्ध म्हात्याराने बाबूला पाहून, "आर ए बाब्या इकडं ये, जरा माझं पाय मुडूप घेतलाय थोडं चोळ र", म्हताऱ्याच्या उद्गारणे बाबू त्याच पाय चोळत बसला सदा म्हणात मुलाच्या शिक्षणाचं नि मुलींच्या लग्नाचा विषय रेंगाळत होतं, चावडीवरच काम आपटून वतनदाराकडे शेती काम लागते का पाहून येतो म्हणून गेला, सकाळी जेमतेम नऊ वाजले होते, घरा बाहेर थांबून, मध्ये आवाज देत होता, "मालक हाय का घरात, "तेवढयात आतून एक महिला बाहेर आली आणि बाब्याला पाहून, मध्ये परतली हातचे बोटे मोडत सकाळ सकाळी याच काय तोंड बघावं लागलं म्हणून दरवाजा बंद करून नंतर येण्यास सांगितली, बाबू थोडं वेळ बाहेरच बसून राहिला, काही वेळाने आतून वतनदार पाहून बाब्याला म्हटलं, "अरे बाब्या तू कधी आला, आज काम बिन काही बी नाय बग, "ये म्हणून आतल्या वारंड्यात बोलावला, बाबूने मालकाला पाणी द्याल का मगल्यास, मलकांनी त्याला घरच्या बाहेरील देवळीत ठेवलेले ग्लास घेऊन येण्यास सांगितला आणि ग्लासला स्पर्श न होता पाणी वाड म्हणून पत्नीस सांगत होता, पाणी पिऊन बाब्या निघाला, आपल्या दारी, पैका तर नाही अन स्वतःची अवस्था पाहून मनातच रडत होता, मलिक लोक बी आम्हाला माणूस म्हणूनही पाहत नाहीत, अस्वस्थ झालेला बाबू आपल्या वस्तीत परतला वस्तीतल्या काठेवर असलेल्या घरा शेजारच्या झाडा खाली आसरा घेऊन, काही वेळ विचार करत होता, पत्नी बाहेच्या आवारात सडा घालत होती, गावातले  दोन पुरुष येऊन बाब्याच्या घरा पुढे थांबून आत डोकावून पाहत

होते, बाब्याला काही कळेनासे झाले, त्यातला एक बोलला, "इथेच राहते बघ ते आयटम", एवढयात बाब्या त्यांच्या जवळ जाऊन त्यांना काय आहे इथे काय तमाशा लावलाय?, बोलतच असतांना बाब्याला "पोरगी येेते का आजच्या दिस, हजार रुपये देतो", म्हणून त्या कर्मठ पुरुषांनी मुलींचा सौदा करू लागले, तेवढ्यात बाब्याचा पायाखालची वाळू सरकली, मस्तकी अंगार उठला आणि त्या एका पुरुश्याच्या कानफड्यात एक देताच, बाब्याला पाहून घेतो, म्हणून ते तिथून निघून गेले, बाब्या तिथेच डोळयातील अश्रू वाहत जमिनीवर बसला, त्याच्या सोबत पत्नी किरकाश आवाजात रडत होती, हे त्या वस्ती साठी काही नवीन नव्हतं, पण हे बाब्याच्या वाटेला पाहिल्यांदाच, ही वस्ती म्हणजे गाववाल्यासाठी हक्कची जमीन समजत होते, कधी पण यायचं आवडेल ते निवडायचं, हे यांच क्रमच, नित्य नेमाने चालत आलेली ही गुलामीच, या वस्तीतला कोणी येत नाही पुढे, स्वाभिमानाने जगणाऱ्या बाब्या आपल्या कुटुंबाला सावरू शकत नाही, देश स्वतंत्र होऊन सत्तरी गाठली तरी देश्यात असे कितीतरी गावे आजही या पुढाऱ्यांच्या हातची गुलामीत राबतात...

बाब्याचा बदला घेण्यासाठी ते दोन पुरुषयांनी रात्रीला या घरावर डाव रचला, काळोख चिराक अंधारात गावच्या काठेवर असलेल्या घरा शेजारी मोटार सायकल वरून दोन पुरुष उतरले बाब्याच्या घराकडे पावले सावकाश पने पडत होते, वसरीवर आपल्या दोन मुली, मुलगा, पत्नी सोबत झोपलेल्या बाब्याला पाहून, त्याच्या बाजूच्या मुलींना आपल्या जवळील शस्त्राच्या साह्याने एखाद्या हरनावर वाघाने झेप घ्यावी या अवस्थेत त्या मुलींच्या अब्रूची लक्तरे रस्त्यावर टांगली, बाब्याची डोळे उघडे पण करणार काय, वस्तीतल्या प्रत्येकाला माहीत आहे, या गावातील पुरुषांच कृत्य, ओरडाओरड केली, मुलींना त्यांच्या तावडीतून सुटका

कराव या साठी जीवांच्या ओतांडाने प्रयत्न करत होता, बाब्याच्या गळयावर सूरी पकडून नको ते कृत्य त्यांच्या डोळयासमोर करत होते, असेच जीव दूमटून बसला, सर्वस्व आवरून, पळ काढले, या मुलींच्या अंगावरील चिंड्या पाहून स्वतःला सावरणाशी झाला, बाब्या स्वतःला सावरून न्यायासाठी पोलीस स्टेशन गाठला, गाववाल्यांना समजलं बाब्या ठाणे गाठलं, गावातली वतनदार तिथल्या पोलिसाला लाचेच्या आशेखाली गुंतवून घेतला, पोलिसांनी बाब्याला अटक केलं, गुन्हा काही सांगत नाही, स्वतःच तक्रार घेत नाहीत, सकाळ झाली जना स्टेशन ला आली पतीला लॉकर मध्ये पाहून ठाणेदारांना गुन्हा विचारली, तर त्यांनी स्वतःच्या मुली वापरून वस्तीत व्यवसाय चालवत असल्याचे बिनबुडाचेे गुन्हे बाब्यावर लावले, जना हे ऐकून तिथून धाव घेतली, आणि आपल्या दोन्ही मुलींना घेऊन विहिरीत उडी घेऊन स्वतःसोबत आपल्या मुलींना पण संपवून गेली...

# स्त्री भ्रूण हत्या एक शाप...

" स्त्री भृण हत्या " आसा शब्द कानावर पडला की आंगावरती काटा उभा राहतो, गर्भातच स्वत:च्या पोटच्या बाळाचा गळा घोटने हे एक महा भयावह कृती आहे, नऊ महिने त्या मायेने आपल्या पोटच्या गोळयाला सांभाळून आखेर स्त्री आसल्याचा दावा मीळताच त्याला पोटातच खुडून टाकण्याचे भयंकर विकृती आज समाजात घडतोय, 2003 च्या बदलत्या कायद्याचे अमलबजावणी मात्र कुठे दिसत नाही, 2001 व 2011 च्या जणगनणा वरून स्त्रीयांच्या संख्येत कमतरतेची जाणीव होते, वैद्यकीय आधिकारी कायदेभंग करून आपला व्यवसाय मांडलेल दिसतोय. लिंग परिक्षा केंद्रांना बंदी आसून सुद्धा आज आनेक ठिकाणी लपूनछपून हे सोनोग्राफी, लिंग परिक्षा करून सदरील तपशील समोरा समोर उघडकीस करून स्त्री आसल्याचा दावा मिळताच तिथेच खुडून टाकण्यासारख माणवताद्रोही वैद्यकीय आधिकारी करतांना दिसतोय.

स्त्री भृण हत्या का होतोय.? आसा प्रश्न मला वेळोवेळी पडत आसते, त्यात मी निष्कर्ष पण काढलो, समाजात हुंडा व स्त्री संरक्षण या कारणांमुळे आज स्त्री जन्माचे दारे बंद होतांना दिसतोय. हुंडा पद्धत जगात आहे का नाही हे मला माहीती नाही पण भारतात मात्र खुले आम चालत, हुंडाविरोधी कायद्याने गुन्हा आहे, तरीपण आपला देशच पुरूषप्रधान आसल्याने स्त्री चा माण कायद्याने पण दिसत नाही. आपल्या देशात स्त्रीयांना आरक्षण मिळाल, प्रत्येक क्षेत्रात प्रवेश मिळाले, खरे पण स्त्री स्वतंत्र आजूनही दिसत नाही. स्त्रीयांना काही मंदिरात प्रवेश दिल्या जात नाही हे आजूनही स्त्री-पुरूष भेदभाव आज समाजात घडतोय, त्यांच्या संरक्षणाच तर अवघे बोंबाबोंब दिसतोय.

आज प्रत्येक सरकारी कार्यालयापुढे स्त्री भृण हत्येची मोठी मोठी बॅनरे उभारली, पण ते आमलात आणण्याच्या बाबतीत मात्र घोर निराशा आहे, आज प्रत्येक पुरूषामागे स्त्रीयांच्या संख्येची कमतरता हा एक गांभीर्याची बाब आहे,

राज्यात शून्य ते सहा वर्ष वयोगटातील मुला-मुलींचे लिंग गुणोत्तर प्रमाण ८४८ पेक्षा कमी आहे. केंद्र सरकारने महिलांची संख्या अत्यंत कमी आहे, अशा १०० जिल्ह्यांची नावे जाहीर केली होती. महाराष्ट्रात ० ते ६ वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींमध्ये दरहजारी मुलींची संख्या १९९१ मध्ये ९४६ होती, २००१ मध्ये ती ९१३ पर्यंत घसरली आणि २०११ मध्ये तर ९१८ इतकी खाली घसरली. गेल्या वर्षी राज्यात अंदाजे ४ लाख ६८ हजार मुलींना गर्भातच मारण्यात आल्याची आकडेवारी समोर आली आहे. चार लाख चिमुकलींचे जगदर्शनागोदरच गर्भातच चिरमुडून टाकण्याचे भयावह कृती करणारा हा समाज किती संकोचीत विचार धारेची आसेल, जि माऊली आपल्या बाळाच पोटातच गळा घोटते, मात्र तीच माऊली स्त्री आसल्याचा भाण बाळगत नाही, ही एक गांभीर्याची बाब आहे, एक स्त्री समाजाला घडवू शकते पण समाज स्त्री जन्माचे दारे बंद केले हे एक देशाचे स्त्रीयाविषयी विकृतीकरण म्हणायला काही हरकत नाही.

समाजाला आई पाहीजे, बहिण पाहीजे, पत्नी पाहीजे पण स्वतः ला मुलगी जन्म नको.? का? कारण समाजात घडणार्या घटना व पद्धतींना हा समाज भेडसावत आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाने प्रगतीचे वारे वाहत असतानाच वैद्यकीय क्षेत्रातील संशोधने मुलींच्या जन्मासाठी शाप ठरली आहेत. राज्यात मुली जन्मालाच न येण्याचे प्रमाण वाढले आहे. या असंतुलनामुळे सामाजिक सुरक्षितता, उतरंड ढासळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्त्री-पुरुष गुणोत्तर प्रमाण घसरण्याने काही राज्यांमध्ये विवाहविषयक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. तोच धोका महाराष्ट्रालाही असल्याचे दिसून आले आहे. कायद्याच्या विरोधी जाऊन काही शासकीय वैद्यकीय आधीकारी स्त्री भृण हत्येच शस्त्र हाती घेवून राज्यात स्त्री नष्ट करण्याचा डाव मांडला आहे.

समाजतल्या समस्याने गर्भपातेत चिरडणार्या बालीकेला हे वैद्यकीय आधिकार समाजाचे खिसे कापून स्वताःचा धंदाच मांडलेत आसे म्हणायला हरकत नाही, कायद्याने सोनोग्राफी, लिंग परिक्षाचे तपशील उघडकीस केल्यास त्या वैद्यकीय आधिकार्यास तिन वर्षाची सजा आहे, तरी पण आज पर्यंत आशी बातमी कुठे ऐकतांना व वाचतांना आढळली नाही की

स्त्रीभ्रूण हत्या हा समाजाला लागलेला कलंक दूर करण्यासाठी खऱ्या अर्थाने सामाज प्रबोधनाची गरज आहे. विनाशाच्या खाईकडे चाललेला समाज भरकटलेले स्त्रीभ्रूण हत्येचे बीज याला आज वाचविण्याची गरज आहे. एक स्त्री वाचली तर एक कुटुंब वाचेल, एक घर वाचले तर एक वस्ती वाचेल, एक वस्ती वाचली तर एक खेडे वाचेल, ऐक खेडे वाचले तर एक तालुका वाचेल, ऐक तालुका वाचला तर एक जिल्हा वाचेल, एक जिल्हा वाचला तर एक राज्य वाचेल, एक राज्य वाचले तर एक देश वाचेल, एक देश वाचला तर संपूर्ण जग वाचेल, म्हणूनच मला असे वाटते स्त्रीभ्रूण हत्या थांबलीच पाहिजे. त्या साठी सर्व प्रथम हा समाज जागा झाला पाहीजे, शासनाच्या कायद्याची अमलबजावणी करणे गरजेची आहे.

पुरुष हा कुटुंबाचा प्रमुख असतो. कर्ता-धर्ता असतो. त्यामुळे पुरुषाला कुटुंबात अनन्यसाधारण महत्त्व असते. हीच गोष्ट मुले लहानपनापासून पाहत असतात. म्हणून त्याच गोष्टी त्यांच्या मनामध्ये रुजतात. मुलांना लहानपणापासून विशेष वागणूक मिळते. महागडी खेळणी, पौष्टिक आहार, मैदानी खेळ, मान, सन्मान इ. तर मुलींना बंधनात वाढवले जाते. हे करू नकोस ते करू नकोस. घरकामात लक्ष घाल, मुलीना असच वागायला हवं, सगळीकडे मोजमापे लावली जातात. सतत तू मुलगी आहेस याची जाणीव करून दिली जाते. लग्न झाल्यावर मुलीला सासरी जाव लागत म्हणजेच ती परक्याच धन आहे. अर्थातच तिला किती शिकविले तरी त्याचा

आपल्याला काहीच उपयोग नाही. असा चुकीचा ग्रह निर्माण झाला आहे. मुलीच्या लग्नाच्या वेळी द्यावा लागणारा हुंडा मुलगी किती ही शिकली तरी तिच्या योग्यतेचा वर शोधताना आई वडिलांची होणारी फरफट आणि हुंड्यासाठी करावी लागणारी तडजोड मुलींच्या नजरेतून सुटत नाही. मुलगी जन्मली की तिच लग्न होईपर्यंत याच व्यथेने पालक व्यस्त असतात. म्हणजेच स्त्री- भृण हत्येच्या पद्धतीला म्हणजेच समस्येला हुंडा पद्धती अप्रत्यक्षपणे हातभारच लावत असते.

आपल्या समाज व्यवस्थेतच ही संकल्पना ठाम रुजलेली आहे की मुलगा म्हातारपणी आपला सांभाळ करेल, मुलगी काय लग्न झाल की सासरी निघून जाईल. त्यामुळे जर मुलीकडे राहावे लागले तर पालकांना फार अपराध्यासारख वाटत आणि समाजातही त्यान मान मिळत नाही. मुलगी जन्मालाच न आलेली बरी असा एकांगी विचार करण्यास प्रवृत्त करते, आई वडिलांनी लहानपणापासूनच दोन अपत्यामध्ये भेदभाव करू नये, जेणेकरून मुलामध्ये हे विचार रुजणार नाही याची काळजी घ्यावी. मुलगा किवा मुलगी असो. दोघानाही समान वागणूक मिळायला पाहिजे. दोघानचीतुलना ही कधीच करू नये. तरच आज स्त्री स्वतंत्रता मिळते व स्त्री भृण हत्येला आळा घालण्याच काम पण सलगरित्या होऊ शकते.

# महिलांची सुरक्षितता धोक्यात....

बलात्कार वा लैंगिक शोषण ही एक भयानक विकृती आहे. ती व्यक्तिसापेक्ष असल्याने तिची व्यापकताही अमर्याद व विशाल आहे. या विकृतीला संपविण्यासाठी संबधित कायदे जरी केले असेल तरी न्याय मिळविण्यासाठी प्रक्रिया ही फार विलंबाची व किचकट असल्याने तिच्या वाटेलाच सहसा कोणी जात नाही. परिमाणतः अश्या बलात्कारित महिलांचे मानसिकदृष्या कमालीचे खच्चीकरण होते. कारण अशा पडित महिलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन हा कलुषित वा अन्यायकारकच असतो. एकीकडे अंतराळात झेप घेणार्या एव्हरेस्टचे सर्वोच्च शिखर गाठणार्या महिला आपल्या यथोचित आत्मप्रतिष्ठेचे दर्शन घडवत आसताना दुसरीकडे अन्याय, आत्याचार, बलात्कारांसारख्या समस्यांना समोरे जाताना मात्र मनोद्रोर्बल्याचाच परिचय घडवितात. यावरून स्त्रियांना सरंक्षणाची गरज आहे. महिला सुरक्षेच्या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे, हे ध्यानात येते.

आपला भारत देश पुरूषप्रधान संस्कृतीचा आहे ; पण इथे फक्त पुरूषांचीच मान वर असते. स्त्रियांना अनेक क्षेत्रात प्रवेश मिळाला, त्या प्रत्येक क्षेत्रात भाग घेण्यास पुढाकार घेत आहेत खरे; पण त्यांच्यावर होणार्या अन्यायावर मात्र योग्य तोडगा निघत नाही. महिला सुरक्षेचा मुद्दा पुन्हाःपुन्हा चव्हाट्यावर येतो आहे. महिलेवर होणारे आत्याचार आणि त्यांना योग्य न्याय मिळत नसल्याचे पाहून खरोखरच लाज वाटते. "हुंडा घेणे व देणे कायद्याने गुन्हा आहे " हे वाक्य फक्त सरकारी कार्यालयापुढे लावली जाणार्या बॅनरपुरतेच मर्यादित आहे. त्या वाक्याची अंमलबजावणी मात्र झाल्याचे दिसत नाही. हुड्यामुळे आज स्त्रीभ्रूणहत्येसारखे प्रकारण घडत आहे. मुलींच्या बापाकडून हुंड्याची मागणी करून त्यात काही

कमतरता भासल्यास मुलींना मारहाण, जिवे मारण्याची धमकी असे प्रकार वाढत आहेत. सासरकडून होणार्या आत्याचारास कंटाळून अनेक महिलांनी आपला जीव गमावला आहे.

आपल्या देशाला स्वातंत्र मिळाले. देशात लोकशाही आली. सर्वांना समान हक्क आला. अनेक महिला आपल्या हक्काची जाणीव करून घेत खुप उंचावर पोहचल्या ; पण त्यांच्या सुरक्षेच्या बाबतीत अवघीच बोबांबोंब दिसते. काही दिवसापुर्वी दिल्लीत झालेल्या एका आल्पवयीन मुलीवर सामुहिक बलात्काराची घटना आठवता अंगावर काटा उभा राहतो. इतकी गंभीर घटना होती. त्या घटनेनंतर देशातील महिला रस्त्यावर उतरल्या, तेव्हा वाटले, आता दाशात महिलांना सुरक्षा मिळेल. कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होइल; पण त्याबाबत घोर निराशा झाली आहे. महिलांवरील आत्याचाराची मालिका काही थांबत नाही. लैंगिक आत्याचाराबरोबर मारझोड, घटस्फ़ोट, सासरच्या माणसांकडून होणारा शारिरीक आणी मानसिक त्रास, लग्नासाठी धमकी देणे, पळवून नेणे अशा अनेक कारणांनी महिलांवर आत्याचार होतो. आत्याचार वाढण्यास सरकार, पोलिस खाते जबाबदार आहे. सरकारने केलेल्या स्त्री संरक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित होत नाही. आत्याचार झेलेली पीडीत व्यक्ती पोलीसांकडे जाऊन आपल्यावर आत्याचार झाल्याची नोंद करत नाही. कारण नोंद केली तरी पोलीसांकडुन तपास योग्य रीतीने होइल याची खात्री नाही.

मागील आठ दहा दिवसा खालील बातमी एका 12 वी च्या इयत्तेत प्रवेश घेण्यासाठी आलेल्या आल्पवयीन मुलीला त्या मुख्याद्यापकाने व अन्य काही शिक्षकांने त्यांच्या विषयात व 12 वी उत्तीर्ण करण्याची आमिष दाखवून त्या

अल्पवयीन मुलीवर लैंगिक शोषण करण्यात आले, किती भयानक विकृत आहे, आस्या समस्यांना तोंड देत आज कित्येक स्त्रीयांनी व अल्पवयीन मुलींनी आपल जिवनयात्रा संपविली.  आसे एखादे प्रकरण डोळयांसमोर आठवता शरिरांचा थरकाप उडतो. समाजात चालणारे हे महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा आज चाव्हट्यावर आला आहे, माणासातल्या  माणूसकीपणाला हि शोभेनासी बाब आहे. आपल्या वाईट नजरेंच्या प्रभावाने समाजात स्त्रिया असुरक्षित आहेत.

सिनेमातील नटीच्या देहाचे विभत्स प्रदर्शन, दुरदर्शन वरील मालिकामध्ये महिलांवर होणारे आत्याचार दाखवले जातात. याचा परिणाम देशातील समाजावर होतो. देशात पसरणाऱ्या वाईट नजरेंच्या विचारांचे प्रदर्शन पाहुण प्रत्येक मुलींचे पालक आपल्या मुलींना शाळेत, महाविद्यालयात धाडण्याच धाडस करत नाही. मुलगी शिकली म्हणजे पर्ण कुठूंब शिकण्यासारखे आहे. म्हणून मुलींना शिक्षण घेण्यास पृवृत करावे. त्यांच्या शिक्षणात आडथळा येवू नये याची पण कायद्याने अंमलबजावणी करणे गरजेच आहे. प्रत्येक व्यक्तीने महिलांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात एकजूटीने उभारने गरजेच झाले आहे. महिलेंवर होणाऱ्या आत्याचार रोखणे हे प्रत्येक माणवाचे कर्तव्य ठरते.

## स्त्रीचं अस्तित्व किती..?

अन्यायावर अन्याय या स्त्रीने
सहन करावे तरी किती,
न्यायासाठी रस्त्यावर उतरून
हक्काची भीक मागावे तरी किती..?


रस्त्यावरील माझ्या बहिणीने
चालतांना जपावे तरी किती,
समाजकंठकांच्या भीती पोटी
घरात दुमडून बसावे तरी किती..?

स्त्री-पुरुष समानता देऊन समाज
अंगीकार करतोय तरी किती,
या माझ्या माता भागणींना
समाजात समानता मिळतो तरी किती.?

रस्त्यावर लचके तोडणाऱ्या
नराधमांची हिम्मत तरी किती,
शारीरिक शोषणाच्या आहारी
ही स्त्री अजून मारावे तरी किती..?

स्त्रियांना भोग वस्तू म्हणनाऱ्या
कर्मठाना ठेचावे तरी किती,
शेवटी त्या दृष्टीने पाहणाऱ्या
समाजापुढे गाऱ्हाणे गावे तरी किती..?

मिळेल का हो स्वतंत्र स्त्रीला असे
म्हणण्यात तत्य आहेच तर किती,
न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागते
न उतरता न्याय मिळालाच तरी किती..?



धन्यवाद.... !

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन
सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान